# विश्वात्मक माझा स्वामी निवृत्तीराजा

डॉ. ग. वा. तगारे, सांगली

गेल्या वर्षी ज्ञानदेवांच्या ७०० व्या समाधि दिनाचा सोहळा सर्व महाराष्ट्रभर मोठ्या उत्साहाने साजरा झाला. सभा, संमेलने, परिसंवाद या विद्वत्परिषदाबरोबर हजारो लोकानी ज्ञानेश्वरी पारायणे केली. गुर्वाज्ञेने आरूढपतित (संन्यास आश्रमातून परत गृहस्थाश्रमात आलेल्या) झालेल्या वडिलांच्या पोटीजन्म झाला म्हणून चांडालत्वाच्या शिक्का बसलेल्या संत श्रेष्ठांचा निदान ७०० वर्षांनी गौरव होत आहे हे पाहून स्वर्गात त्यांच्या मात्यापित्याच्या डोळ्यांत आनंदाश्रु ओघळले असतील. ज्ञानदेवांबद्दल महाराष्ट्राने कृतज्ञता व्यक्त करताना एक मोठी अपूर्तता राहून गेली. ज्ञानेश्वरी, पारायणासारखी, ज्ञानदेव तत्त्वज्ञानाचे रहस्य असलेल्या **अमृतानुभवाची** (मूळ नाव 'अनुभवामृत') पारायणे झाल्याचे माझ्या वाचनात आले नाही. पण गीतेवरील 'भावार्थ दीपिका' हा टीका ग्रंथ दाखवल्यावर ज्यांनी 'ग्रंथ तिका परि संप्रदायु नोहे' असे म्हणून ज्यांनी ज्ञानदेवांना आपल्या संप्रदायाचे तत्त्वज्ञान सांगणारा ग्रंथ (अनुभवामृत) लिहिण्यास प्रवृत्त केल्या त्या सद्गुरूंची - वडील बंधू निवृत्तनाथांची - फारशी आठवण कुणाला झाल्याचे ऐकिवात नाही.

पण स्वत: मागे राहून आपल्या धाकट्या भावांकडून एवढे मोठे कर्तृत्व करवणाऱ्या त्या श्रेष्ठ संतांची आज ७०० वी पुण्यतिथी आहे. त्या निमित्ताने पुण्यस्मरण.

नाथ सांप्रदाय स्वीकारलेल्या 'निवृत्तीदेव विठ्ठल कुलकर्णी आपेगावकर' या श्रेष्ठ संतांचे हे पुण्यस्मरण आहे. अंधश्रद्धेने मूळच्या सुंदर मूर्तीवर शेंदूर फासून तिचा निराकार. दगड बनवण्याचा हा प्रयत्न नाही. त्यामुळे मी चमत्कारांची नोंद - ऐतिहासिक पुरावा नसल्यामुळे करणार नाही. निवृत्तीनाथ त्यांची भावंडे आणि नामदेव यांचे अभंग हा माझा आधार आहे. पण त्यातील कोणते मूळचे आणि कोणते प्रक्षिप्त हे विद्यमान महाराष्ट्रातील कोणीही निश्चितपणे सांगू शकत नसल्यामुळे या माहितीची ऐतिहासिकता मर्यादित आहे.

परंपरेप्रमाणे निवृत्तीनाथांचा जन्म इ. स. १२७३ मध्ये झाला असे मानले जाते. (संकल संतगाथा - प्रस्तावना पृ. ३) मुले थोडी मोठी झाल्यावर विठ्ठलपंतांनी त्र्यंबकेश्वर ब्रह्मगिरीला प्रदक्षिणा घालताना वाघाच्या आरोळीनी झालेल्या पळापळीत निवृत्तीदेव वाट चुकून नाथ संप्रदायातील गयनी (इति निवृत्तीनाथाचे अभंग) -गैनी, गहनी - या सिद्ध पुरूषाचे गुहेत गेले. आम्हा सामान्यांना हे न समजणारे संकेत आहेत. पण

— ❖ ❖ ❖ —

**संत ज्ञानदेव महाराष्ट्राचे माऊली म्हणून घराघरात विराजमान झालेले आहेत. पण त्यांना घडविणारे श्रीगुरू निवृत्तीनाथ यांचा मात्र अनेकांना फारसा परिचय नाही असे दिसते. अर्थात हा सुद्धा निवृत्तीनाथांच्या कार्याचाच मोठेपणा आहे. अशा या ज्ञानदेव गुरू निवृत्तीनाथांची ज्येष्ठ महिन्यात ७०० वी पुण्यतिथी आहे नाशिक जवळील श्रीक्षेत्र त्रिंबकेश्वर येथे त्यांची समाधी असून दरवर्षी ज्येष्ठ महिन्यात तेथे मोठी यात्रा भरते. त्यांच्या सप्तशताब्दी पुण्यतिथी (२ जुलै ९७) सोहळ्या निमित्त खास लेख -**

— ❖ ❖ ❖ —

गयनीनाथानी निवृत्ती देवांना शांभवी दीक्षा दिली आणि त्या दीक्षेचे वैशिष्ट्य म्हणजे सर्ववर्ण समानता: दीक्षेचा परिणाम व्यक्त करताना म्हटले आहे : **शुद्रोऽपि विप्रतांयाति**

असे सांगितले जाते की, निवृत्ती-नाथ (दीक्षेनंतरचे नामांतर) गुरूंच्या सहवासात एक आठवडा होते. त्या मुदतीला गयनी नाथांनी आपल्या सांप्रदायिक साधनेचे तंत्र त्यांना शिकवले असावे आणि ते निवृत्तीनाथांनी आत्मसात केले. असामान्य बुद्धिमत्तेची वा ग्रहण शक्तीची अपवादात्मक माणसे असतात. (उदाहरणार्थ गणिती रामानुजन्) त्यापैकी निवृत्तीनाथ असावेत. निवृत्तीनाथांचे वडील विठ्ठलपंत संस्कृतज्ञ आहेत. हे मुलाकडून समजल्यावर (गोसावी मठ संस्थेत 'वारस' नेमतात- तसे गयनी - नाथांचा मठ नसल्यामुळे) त्यांचे 'वारस' निवृत्तीनाथ यांच्याबरोबर त्यांनी आपल्या काही सांप्रदायिक पोथ्या विठ्ठलपंताकडे पाठवल्या असाव्यात आणि त्यातील शैव ग्रंथाचे संस्कार ज्ञानेश्वरांचे लेखनात दिसतात. कारण नाथ सांप्रदाय हा आगमाधिष्ठित असल्यामुळे महाराष्ट्रीय ब्राह्मण -निदान त्या काळात तरी - आगमिक ग्रंथ संग्रहात ठेवण्याची शक्यता कमी आणि विठ्ठलपंतामुळे चांडालत्वाचा शिक्का बसलेल्या या मुलांना जवळ असल्या तरी त्या काळातल्या कोणत्याही ब्राह्मणाने आपल्या पोथ्या दिल्या नसत्या. ही वास्तवता लक्षात घेतल्यास नाथ सांप्रदायिक पोथ्या गयनीनाथांनी विठ्ठलपंतांकडे त्यांच्या मुलाबरोबर - निवृत्तीनाथाबरोबर पाठवल्या असाव्यात असे वाटते.

निवृत्तीनाथाबद्दल समकालीन पुरावा नामदेवांचे अभंगात मिळतो. पण **सकळ संतगाथ्यात** आढळणारे अभंगात **नामदेव दामाशेट्टी,** विष्णुदास नामा आणि आणखी नामधारी 'नामा' मुद्रांकित कवी यांचे मिश्रण असल्यामुळे ज्ञानदेवांचे स्नेही व समकालीन नामदेवांचे नेमके अभंग कोणते हे सांगणे अवघड आहे. पण प्रत्येक घटनेचे साक्षीदार असल्याप्रमाणे ज्ञानदेवादी भावंडांची समाधिवर्णने प्रभावीपणे करणारा नामदेव विश्वसनीय मानावा. भजनामध्ये गाइले जाताना नंतरच्या पिढ्यांचे भाषिक संस्कार होऊन त्यांचे अर्वाचीकरण होणे अपरिहार्य आहे. पण दगडाला पाझर फुटेल असे ज्ञानदेव समाधीचे हृदयद्रावक वर्णन करणारा भावनाप्रधान, शब्दप्रभु **नामा** विश्वसनीय साक्षीदार मानण्यास आक्षेपार्ह काही नाही. ज्ञानदेव समाधीचे वर्णन इतके आर्त करुण आहे की, कालिदासाचा रघुवंशातील विलाप', अश्वघोषाच्या सौंदरानंदातील 'सुंदरी विलाप' (सर्गद्द) किंवा टेनिसनने In memorium° या जागतिक कीर्तीच्या विलापिकामध्ये त्याला स्थान मिळावे. माझ्या माहितीप्रमाणे मराठीत इतकी हृदयद्रावक विलापिका कुणी लिहिली नसेल.

नामदेवांचे अभंगात निवृत्तीनाथासंबंधी कालोल्लेख नसलेले पुढील प्रसंग आहेत. (१) निवृत्ती - ज्ञानदेवांची पंढरपूरला प्रथम भेट, निवृत्ती - ज्ञानदेव विठ्ठलाला नमस्कार व नामदेवांना नमस्कार व प्रदक्षिणा करतात. नामदेवांचा अहंकार सुखावतो, पण मुक्ताईच्या फटकारण्याने अस्वस्थ, (२) गोरा कुंभारांनी नामदेवांना 'कच्चे मडके' ठरवलेल्या संत सभेत (तेरला) निवृत्तीनाथांची उपस्थिती, (३) ज्ञानदेव-नामदेवांच्या तीर्थयात्रेनंतर नामदेवांनी घातलेल्या मावंद्यात इतर संतांबरोबर निवृत्तीनाथ सहभागी.

**स्थला - काल निश्चित प्रसंग:**

(१) ज्ञानेश्वर समाधि घेण्यापूर्वी देवाने दिलेले शेवटचे प्रेमभोजन आणि ज्ञानदेवांना समाधिस्थळी नेऊन बसवले. ज्ञानदेवांचे वय २२ वर्षांचे (अभंग १०३५-११०५) ज्यानंतर सोपानदेवांनी आपले समाधीसाठी सासवड प्रयाण (२) सोपानदेव समाधि (अभंग ११०६-११४५) - सोपानदेवांचे समाधीची शिळा बसविल्यानंतर :

**निवृत्तीमुक्ताईने घालियेली घोण। करितो समाधान पाडुरंग**

(अभंग (११४२)

(३) चांगदेव समाधीनंतर नेवाशाला प्रयाण

**म्हाळसापुरा। तेथे ज्ञानेश्वरी पूर्ण झाली॥** (अभंग ११७१)

(४) नेवाशाहून पैठणला प्रयाण (अभंग ११७३)

(५) पैठण ते आपेगाव (अभंग ११७४)

भक्त त्र्यंबक पंत मूळ पुरुष आदि। तयाची समाधी आपेगावी तेथे मुक्ताईच्या भावनांचा बांध फुटला. नामदेव म्हणतात. **''आला से उमाळा ओसंडोनि''** मुक्ताई म्हणते.

**तात आणि मात गेलीसे येथून**
**तेव्हा आम्ही लहान पांडुरंगा ॥२॥**
**निवृत्ती-ज्ञानेश्वर कोरान्नाचे अन्न।**
**सांभाळी सोपान मजलाशी ॥१॥** (अभंग ११७५)

(६) वेरूळला धृष्णेश्वर दर्शनार्थ प्रयाण (चैत्र १०) अभंग ११७६

(७) मुक्ताई-जीवनाविषयी उदास - निवृत्तीनाथांना तिला हाताने धरून चालवावे लागे. तापी तीरी त्याकाळी प्रसिद्ध असलेल्या सोमेश्वर क्षेत्रास आगमन वैशाख वद्य दशमी निवृत्तीनाथांनी एकांतात मुक्ताबाईला कोणत्या दिवशी जायचे निश्चित केले असे विचारताच मुक्ताबाईने सांगितले परब्रह्म स्वरूप सर्वत्र असल्यामुळे कुठे जाण्यायेण्याचा प्रश्नच नाही. ? असे म्हणून ती कडालेल्या विजेसरशी 'स्वरूपी मिळाली' नामदेव सांगतात.

**निवृत्तीने एकांत केला मुक्ताईशी।**
**गमन कोणे दिवशी आरंभिले**
**मुक्ताई म्हणजे जावे यावे कोठे।**
**अवघे निघोर स्वरूप स्वामी ॥**
**अन् गर्जता गगन कडाडली वीज।**
**स्वरूपी सहठ मिळयेली ॥**
**मावळ्ता दीप ज्योत कोठे होती।**
**सहज सामावती निरंजनी**

या काव्यमय वर्णनाचा अर्थ इतकाच की मुक्ताईचा शेवट वीज पडून झाला अन् तिचे अवशेषसुद्धा उरले नाहीत. कारण पुढे आणखी स्पष्टपणे नामदेव सांगतात. वैशाख वद्य दशमीला (अभंग ११९४)

**कडाडली वीज निरंजनी जेव्हा।**
**मुक्ताबाई जेव्हा गुप्त झाली**

मला वाटते पंचमहाभूतात पंचमहा भूतात्मक शरीर विलीन करण्याचा यौगिक पद्धतीने मुक्ताईने देह सोडला.

(८) अन् आता शेवटचे पर्व. त्या महापुरुषाने जन्मभर दुःखेच भोगली. अखेर आपल्या सद्गुरू ठिकाणी त्र्यंबकेश्वरला जाऊन देह ठेवावा असे त्यांनी ठरवले. नंतर सप्तशृंगीदेवीचे दर्शन आणि सप्तशृंग पर्वताला प्रदक्षिणा घालून ते ज्येष्ठ वद्य एकादशीला त्रिंबकेश्वराला आहे. ते गालित गात्र झाले होते ज्येष्ठ वद्य द्वादशीला सर्व वैष्णवानी एकादशीचे पारणे केले. नेहमीच्या पद्धतीप्रमाणे शेवटचे देवाला नमन केले आपल्या अभंगाची पोथी, ग्रंथ विठोबासमोर ठेवला आणि आपल्या

आपणच ते ञमाधीस्थळी उतरले. 'पुंडलिक पांड्ञरंग गेले बरोबरी' याचा अर्थ त्यांच्या तोलाचा संत त्या समुदायात नव्हता. ज्ञानदेव-सोपानांना समाधी स्थळह बसवण्यास निवृत्तींाथ होते. पण या एकट्या उरलेल्या मगापुरुषाला समाधीत नेऊन बसवण्यासाठी बरोबरचे कोणी उरले नव्हते. निवृत्तिदेवांनी सगळ्यांना वंदन केले, विठोबाचे तीर्थ घेतले. निवृत्तीनाथ नंतर 'सुचित्त'समाधी बसले आणि आपले नयन झाकले अन् समाधीची शीळ झाकली एका दुर्दैवी महापुरुषाच्या जीवनाचा हा तेजस्वी आलेख आहे. नामदेवांनी या समाधीचेच नव्हे तर ज्ञानदेवांच्या समाधीपड्सून निवृत्तीनाथांच्या समाधी अखेर प्रत्येक घटनेचे इतके तपशीलवार वर्णन केले आहे की हा भावनाप्रधान ज्ञानेश्वरांचा सखा समक्ष हजर होता. अन् हे सर्व अभंग नामदेवांचे असावेत असे मानण्यास प्रत्यवाय नसावा.

गेल्यावर्षी आपण ज्ञानदेव समाधीचा सप्तशताब्दी महोत्सव साजरा केला ही ज्ञानेश्वरानी महाराष्ट्राला दिलेल्या साहित्य आणि तत्त्वज्ञान या विषयांवरील अनमोल देणगीबद्दल वाटणारी कृतज्ञता. पण निवृत्तीनाथांनी अशी काय कामगिरी केली की जिच्याबद्दल आम्ही त्यांचा सप्तशताब्दी उत्सव करावा.

याचे एका वाक्यात उत्तर म्हणजे निवृत्तीनाथांनी आम्हाला ज्ञानेश्वर दिले. या लेखाच्या प्रारंभी ज्ञानदेवांनी निवृत्तीनाथाबद्दल व्यक्त केलेला आदर हा केवळ भ्रातृप्रेमाचा द्योतक नाही. भगवद्‌गीतेवरील 'भावार्थ दीपिका' ही ज्ञानदेवांनी टीका लिहिल्यावर परखडपणे निवृत्तीनाथ म्हणाले, ''ग्रंथु निका. सांप्रदायिक नोहे'' आणि ज्ञानदेवानी आपले प्राचीन परंपरेतील शिव ग्रंथ वाचुन ८०० ओव्यात अनुभवामृतासारखा अप्रतिम ग्रंथ तयार केला. त्यातील मंगलाचरणातील पहिल्या श्लोकात

**यदक्षरं अनाख्येयं आनन्दं अजं अव्ययम्**
**श्रीमन्निवृत्तिनाथेति ख्यातं दैवत माश्रये ॥**

ज्ञानदेवांनी निवृत्तिनाथाना 'दैवत' म्हणून परब्रह्माला लावली जाणारी विशेषणे त्याना वाहिली आहेत.

## निवृत्तींची गुरुपरंपरा

आपली गुरुपरंपरा सांगताना निवृत्तीनाथ म्हणतात

**आदिनाथ उमाबीज प्रकटले ।**
**मच्छिंद्रा लाधली सहज स्थिती**
**तेचि प्रेममुद्रा गोरक्षा दिधली ।**
**पूर्ण कृपा केली गयनि नाथा**
**निवृत्ति गयनी कृपा केली असे पूर्ण।**
**कूळ हे पावन कृष्णनामे**

(संकलसंत गाथा - अभंग १७२)

यावरून आदिनाथ-मच्छिंद्रनाथ-गोरक्षनाथ-गयनीनाथ अशी परंपरा बहुधा गयनीनाथांनी त्यांना सांगितली असावी आणि तीच ज्ञानदेवांनी आपल्या गीताटीकेच्या उपसंहारात (अध्याय १८ ओव्या १७५१-५८ ज्ञानेश्वरी दांडेकर आवृत्ती) सांगितलेली आहे.

या परंपरेतील मच्छिंद्रनाथ-गोरक्षनाथ-नाथपंथ संस्थापक असतील तर त्यांचा काळ इ.स.चे ९ वे शतक आहे. कारण गोरखनाथ बंगालचे राजे देवपाळ (इ.स.८१५-८५४) चे समकालीन होते. (राहुल सांकृत्यायन-दोहाकोष प्रस्तावना पृ.२२), आणि या मुलाला सर्व गुरू परंपरा सांगत बसण्यापेक्षा नाथसंप्रदायाचे संस्थापक सिद्ध म्हणून 'मच्छिंद्र-गोरख' ही नावे सांगितली असावीत.

एक गोष्ट स्पष्ट आहे की जरी निवृत्तीनाथानी स्वतः ग्रंथरचना केली नसली तरी त्यानी आणि ज्ञानदेवानी वडील असे पर्यंत त्यांच्याजवळ संस्कृत (बहुधा) वेदान्त वाचला असावा आणि त्यांनी ज्ञानदेवांना आवश्यक तेथे मार्गदर्शन केले असावे. कारण ज्ञानदेव निवृत्तिनाथ बद्दल ग्रंथभर आदर व्यक्त करीत असले तरी समारोपात म्हटले आहे.

**तैसे श्री निवृत्ति नाथाचे । गौरव आहे जी साचे ।**
**ग्रंथ नोहे हे कृपेचे । वैभवतये ॥**

**अनुभवामृताच्या** संस्कृत मंगला चरणाच्या पहिल्या श्लोकात ज्ञान देव म्हणतात.

**यदक्षर मनारव्येय मानन्द मज मेकलम ।**
**श्रीमन्निवृत्तिनाथे ति ख्यातं दैवत माश्रये ॥**

**अनुभवामृताचे** दुसरे प्रकरण **श्रीगुरू महिमा** हे सदगुरू पदाचे महात्म्य वर्णन करणारे असले तरी **अनुभवामृताचे** श्रेय ते निवृत्तिनाथांचे नाव घेऊन त्याना देतात. ते म्हणतात

**मोडो निया माया कुंजरू । मुक्त मोतियाचा बोगरू**
**जेवविता सद्‌गुरू । श्री निवृत्ति वंदु ॥ २.३**
**नाही आत्मया आत्मप्रवृत्ति । वाढविता के निवृत्ति ॥**
**परी या नामाची वाय बुंथी । सांडोचिना ॥**
**निवर्त्य तवं नाही । मा निवर्तवी हा काई ।**
**परि कैसा बसे ठायी । निवृत्ति नामाच्या ॥**

ते सर्व प्रकरण सदुरू स्वरूप, महत्व इ. विषयावरील असले तरी निवृत्तिनाथांचे नाव घेऊन केलेला गौरव औपचारिक मानण्याचे कारण नाही.

चांगदेव पासष्टीच्या उपसंहारात आपण निवृत्तिनाथाशी विचार विनिमय करून चांगदेवाना ते ६५ ओव्यांचे उत्तर पाठवले आहे हे स्पष्ट करण्यासाठी ज्ञानदेव लिहितात.

**चांगदेवा तुझेनि व्याजे । माउलिया श्री निवृत्तिराजे ।**

**स्वानुभव रसाळ खाजे । दिधळे लोभे ।**

ज्ञानेश्वरी, अनुभवामृत आणि चांगदेव पासष्टी या ग्रंथातून ज्ञानदेवानी निवृत्तिनाथाबद्दल जे इतके जिव्हाळ्याने लिहिले ते औपचारिक पारंपारिक असे म्हणून ज्ञानदेवांच्या भावनांचा अवमान न करता त्यात सत्य असले पाहिजे असे मानणे सयुक्तिक ठरेल. त्यामुळे निवृत्तिनाथ **शाब्दे परेच निष्णात:** होते याबद्दल मतभेद होऊ नये.

निवृत्तिनाथांच्या जीवनातील ऐतिहासिक म्हणजे ज्याला Hard Facts & History म्हणता येईल अशा स्थल-काल निश्चित घटना फारक कमी आहेत. ज्ञानदेवानी घटना नमूद न करता निवृत्तींच्या मोठेपणाचा गौरव आणि आपल्याय ग्रंथकर्तृत्वाचे श्रेय इतकेच त्यांच्या बद्दल म्हटले आहे.

**'अभंग'** हा वादग्रस्त भाग आहे तो आपण विद्वानांच्या चर्चेसाठी सोडू. ज्ञानेश्वरीत सुमारे २००० ओव्यांचा प्रक्षेप आहे हे मान्य केले तरी तो ग्रंथ ज्ञानेश्वरांचा आहे या बद्दल वाद नाही. अनुभवामृत आणि चांगदेव -- यांच्या कर्तृत्त्वाबद्दल वाद नाही म्हणून त्यातील ओव्याना अधिक महत्त्व अनुभवामृताच्या ६५ पासून पुढच्या सद्गुरूस्तवनाच्या ८० ओव्या वाचताना श्री निवृत्तिनाथ किती मोठे अधिकारी पुरुष होते याची कल्पना येईल. त्यांनी ग्रंथ निर्मिती केली नसली तरी ज्ञानेश्वर साहित्याचे ते केवळ प्रेरक नव्हते तर परीक्षक आणि मार्गदर्शक होते याबद्दल वाद नाही.

नाही म्हणावयास त्यांच्या नावावर सकल संत गाथ्यात' आढळणारे ३५७ अभंग त्यांचे म्हणावेत. मला त्यापैकी बरेच अभंग प्रक्षिप्त वाटतात. पण ती चर्चा येथे न करता त्यांच्या नावावर आढळणारे ३५७ अभंग खुद्द निवृत्तीनाथांचे मानून त्यांचे संक्षिप्तस्वरूप मांडत आहे. ग्रंथ संपादकांनी ते श्रीनानामहाराज साखरे यांच्या संग्रहातील जुन्या पोथ्यावरून घेतले आहेत. मी संपादकानी केलेले अभंगाचे वर्गीकरण मान्य करून त्यांचे संक्षिप्त दिग्दर्शन करतो.

### पंढरी महात्म्य

इतर संतांप्रमाणे निवृत्तीनाथांनी पंढरीमहात्म्य गायले असेल, पण त्यांचा खरा ओढा सद्गुरुचे स्थानाकडे त्रिंबकेश्वराकडे होता. त्यांनी तेथे आवर्जून जाऊन समाधी घेतली. त्यांच्या परंपरेमध्ये तीर्थस्थाने मानवी देहातच आहेत. जुन्या उपनिषदात **'श्रीपर्वत शिरस्थाने, केदारं क ललाटके'** याप्रमाणे त्यांच्या सांप्रदायात देह हेच तीर्थ आहे ही शिकवण होती. मच्छिंद्रनाथांच्या पुष्कळचपूर्वी झालेल्या सरहनाथांनी म्हटले आहे.

'येथेच (या देहामध्ये) सुरनदी, यमुना, गंगासागर, प्रयाग, वाराणसी चंद्र व सूर्य आहेत.'

**एत्थु से सुरसरि जमुणा, एत्थु से गंगा साअरू ।**
**एत्थु पआग वणारसी, एत्थु से चंद्र दिवाअरू ॥** दोहाकोष

त्यांनी ज्ञानदेव नामदेवाबरोबर तीर्थयात्रेला न जाण्याचे हेही कदाचित कारण असेल. नंतर एका संताने म्हटल्याप्रमाणे निवृत्तिनाथांना **'काया ही पंढरी आत्मा हा विठ्ठल'** म्हणता आले असते पण त्यांच्या पंढरीविषयक अभंगात (१-३७) एक परंपरागत माहात्म्य इतकेच त्यांनी लक्ष दिलेले दिसते. त्यांचे समकालीन नामदेव यांनी पंढरीवरून जीव ओवाळून टाकला होता. त्यामुळे निवृत्ती आणि नामदेव यांच्या पंढरपूरबद्दलच्या जिव्हाळ्यात अंतर वाटते.

### बालक्रीडा

### (श्रीहरीच्या सगुण-निर्गुण रुपाचे वर्मन अभंग ३२-१६२)

संत वाङ्मयातील श्रीकृष्णाच्या बालक्रीडेचे वर्णन म्हणजे आबालक वृद्ध वाचकांना आणि श्रोत्यांना अवीट मेजवानी वाटते. त्यातील **'डोळे मुरडत जाणारी राधा'** तरुणांना 'दिलधडके'चा अनुभव देते. दुध, दही, लोणी चोरून खाऊन गवळणींच्या खोड्या काढणारा बाळकृष्ण आपल्यापैकीच हवेहवेसा वाटणारा सवंगडी वाटतो. मुरलीच्यानादाने पशुपक्षांना मोहनी घालणारा कृष्ण, रासक्रीडेत रंगलेला कृष्ण किती किती त्याची लोभस दृश्ये आपल्यावर मोहनी टाकतात. निवृत्तिनाथापासून सर्व संतानी, भागवताच्या दशमस्कंधाच्या पाहिल्या भागात असोत वा नसतो (बहुधा नसतातच) कृष्णाच्या बालक्रीडा मोठ्या रसिकतेने आणि आनंदाने गायल्या आहेत. निवृत्तिनाथांच्या परंपरेत गोरखनाथांच्या वैराग्य प्रधान शिकवणीत संतवाङ्मयातील कृष्णलीला बसतीलच असे नाही. पण निवृत्तिनाथाना कृष्णाच्या बाललीला गाण्याचा मोह आवरला नाही असे (३२-१६२) या अभंगावरून वाटते.

निवृत्तिनाथांच्या आणि त्यांच्यानंतर होऊन गेलेल्या संतांच्या बालक्रीडा वर्णनात काही महत्त्वाचे फरक आहेत.

१) निवृत्तीनाथांच्या बालक्रीडेच्या अभंगात राधेचा उल्लेख नाही.

२) या बालक्रीडेमध्ये रास-क्रिडेचा उल्लेख नाही.

३) या बालक्रीडेत कृष्णाच्या खोड्या, गोपींच्या तक्रारी यांचा उल्लेख नाही

श्रोत्यांच्या आणि वाचकांच्या मनावर श्रीकृष्ण हा परब्रह्म आहे आणि त्याने यशोदा, गोप, गोपी या सर्वांना आपल्या सहवासाने पुनीत केले आहे. या गोकुळवासीयांच्या भाग्याचे वर्णन आहे. श्रीकृष्णाचे परब्रह्मत्व

पुढील काही अभंगातील उताऱ्यावरून स्पष्ट होते.

निरालंब देव निराकार शून्य। मनाचे ही मौन हरपले।
ते रुप साबडे शंखचक्रांकित। यशोदा ते गात कृष्ण नाम।

**जेथे रूप रेखा नाही गुण देखा।**
**चिदाकाश एका आपतत्त्व।**
**ते रूप गोजिरे कृष्ण रूपे सांगा।**
**यशोदेचा पांग हरियेला ॥**

बालक्रीडेतील अभंग क्रम ४२, ५६, ६५, ७६ इ. अभंगातून श्रीकृष्ण हा निर्गुण, निराकार परब्रह्माचे सगुण स्वरूप आहे असे वर्णन आहे.

मला हे अभंग वाचताना एक शंका येते. गयनीनाथ हे गोरक्षनाथ संप्रदायाचे प्रतिनिधी. सिद्ध सांप्रदायाने (अन् नाथसंप्रदायाने या वज्रयान पंथाच्या दोन अक्षरी मंत्राऐवजी 'सोऽहम् मंत्र जपासाठी स्वीकारला. कालांतराने 'ह्रीम्' या बीजमंत्राचा 'राम'हा दोन अक्षरी मंत्रजप मानला. हा 'राम' दाशरथिराम नव्हे ? या बीजक्षराचा निर्गुण राम आहे. कबीरादी उत्तरकालीन संतानी 'निर्गुण रामाची' उपासना केली असे स्पष्ट नमूद केले आहे.

ही जर नाथांची परंपरा असेल तर गयनीनाथांनी 'कृष्ण' मंत्राचा उपदेश निवृत्तिनाथाना केला अशा अर्थी जे अभंग आहेत त्यांची संगती कशी लावायची. उदाहरणार्थ अभंग क्रम १६ मध्ये निवृत्तिनात म्हणतात,

**सुलभ सुमग आगम निगम। तोहा आत्माराम गोपवेषे ॥**
**निवृत्तीचे पार गयनीचे गुज। मज मंत्र बीज उपदेशिले ॥**

**निवृत्तीचे ध्येय कृष्ण हाचि होय।**
**गयनीनाथे सोय दाखविली ॥**
**निवृत्ति गयनी कृपा केली पूर्ण।**
**कूळ हे पावन कृष्णनामे ॥**

मी मान्य करतो की शिवसूत्रात '**चित्तं मन्त्र :' या** शब्दानी मंत्राक्षराना महत्त्व नसून 'जीवना वेगळी मासोळी' च्या आर्ततेने झपाटले जाऊन जे चित्तजप **करते ते चित्त हाच खरा मंत्र आहे. त्यामुळे गयनीनाथांनी जपासाठी परंपरागत 'राम' मंत्र न देता 'कृष्ण मंत्र' दिला तरी आध्यात्मिक दृष्ट्या काहीच बिघडत नाही. मला प्रश्न असा** पडतो की, 'कृष्ण'जप करणारे ज्ञानदेव भगवद्गीतेवरील आपल्या टीकेत कृष्णाचा अतिशयोक्तिपूर्ण काव्यमय गौरव करतात. पण गीताटीकेतनंतर लिहिलेल्या अमृतानुभव वा चांगदेवपासष्टीत कृष्णभक्तीचा वास सुद्धा येत **नाही. त्यांनी ज्ञानेश्वरी, अमृतानुभव आणि चांगदेवपासष्टी या ग्रंथात विठ्ठलाचे कुठेच नाव नोंदले नाही.**

**ज्ञानदेवानी** नामदेवाचे **सहवासात आल्यावर निरक्षर बहुजन समाजाला आपल्या गीताटीकेचा काही उपयोग नाही हे लक्षात घेऊन त्यांना हरिपाठात नामस्मरणाचा 'हरीमुख म्हणा' सांगून या मंत्राचा उघड परंपरागत दीक्षेचा अडसर न** घालता पुरस्कार केला.

रामनाम माहात्म्य

येथे मला आवर्जून नमूद केले पाहिजे की निवृत्तिनाथांनी २९९ च्या अंभगात

**आगम निगम सर्व सर्वोत्तम।**
**दिनदिशी राम सेवीतसे।**
**नेघो हरिवीण दुजे ते पै भिन्न।**
**सांगितली खूण गुरू राजे।**
**निवृत्ति गयनि प्रसाद उन्मनी।**
**निरंतर ध्यानी राम राम ॥**

याचा गयनिनाथानी निवृत्तीना राममंत्राची (त्यांच्या सांप्रदायाच्या प्राचीन काळापासून चालत आलेल्या नाममंत्राची) उपासना सांगितली असा अर्थ होत नाही. 'कृष्ण' नामासंबंधी निवृत्तीनी केलेले **उल्लेख अधिक स्पष्ट आहेत.**

**उघडा मंत्र मार्ग गोविंद स्मरणे।**
**रामनामकीर्तने मोक्षपद।**
**निवृत्ति संचीत रामनाम महिमा।**
**अवघीच पौर्णिमा हरिपाठे।**

**अभंग २६१**

**राम राम जप समत्वे साधावा।**
**अहंकार टाकावा अहंबुद्धि।**
**सुटसी रे नामें आपे आपसंभ्रमे।**
**नित्यनाम ने**मे जपतु जाये।

अभंग २६२

**निवृत्ति म्हणे अक्षर। दोनी रामनाम।**
**जपता पावे धाम। वैकुंठाचे**

अभंग २६३

स्वत:चा जपाचा नाममंत्र काही असला तरी त्यानी समाजाला, रामकृष्ण हरी हा उघडा मंत्र (दीक्षावगैरे स्तोम न माजवता) दिला एवढे निश्चित.

निवृत्तिनाथानी नामपर आणि कीर्तनपर अभंगात (२३७-३२७) हरिनामाचे महत्त्व वर्णन करून ध्यान भजन, कीर्तन यामध्ये नामस्मरण असावे असे आग्रहपूर्वक प्रतिपादन केले आहे. आणि भावी मराठी संतांच्या एतद्विषयक अभंगांची ती गंगोत्री आहे.

निवृत्तिनाथांचे ज्ञानपर अभंग म्हणजे त्यांच्या सर्व शिकवणीचे सार आहे. एका (क्रम.३३४) आत्मपर अभंगात ते सांगतात.

**तंत वितंत त्यामाजि मथित ।**
**नाद उमटत स्वानंदाचा ॥१॥**
**सोहंबीजतत्त्व गुरूनाम मंत्र ।**
**ज्ञानी उपासित हरिराज ॥२॥**
**भेटून कुंडलिणी गोल्हाट निकट ।**
**आत्माराम पेठ पांडुरंग ॥३॥**
**निवृत्ति म्हणे मी सर्वस्व होईन ।**
**हरि हा हो भरीन पूर्ण देही ॥४॥**

येथे निवृत्तीनाथांनी साधना पद्धती सांगताना आपला अनुभव वा मार्ग सांगितला नाहीना.

निवृत्तिनाथ एका अर्थी आद्य मराठी संत असल्यामुळे त्यांच्या अभंगांचे संतपर, नामपर, उपदेशपर, ज्ञानपर हे सकळसंत, गाथ्यातील जे वर्गीकरण केले आहे ज्या आदर्शाप्रमाणे ज्ञानदेव, नामदेव, ते तुकाराम अखेर (अन्नंतरही) झालेल्या संतकवीना अनुकरण केले आहे. निवृत्तिनाथांच्या ज्ञानपर अभंगात शून्य ही जी संज्ञा आली आहे त्याचा निश्चित अर्थ मला लागला नाही. तो अभंग (३५५)असा.

**शून्य ते पुशिले निरशून्य बिंबले । ब्रम्ह उगवले तेजाकार**
**माजिठा श्रीहरी दिसे परोपरी । घट मठसरी एकुशोभे ।**
**निवृत्ति दाटुगे गुरुमुखे कळले । सर्वत्र गोपाळे केले मन ।**

निवृत्तिनाथाना सर्वंखल्विदं ब्रम्ह चा साक्षात्कार गुरुमुखे झाला. पण शून्यते पुशिले निरशून्य बिंबले यातील शून्य चा नेमका अर्थ काय उपनिषत्काळात (उदा मैश्रायणी उपनिषदात (२.४) आत्म्याचे वर्णनात शूध्द: पृत: शून्य: शान्त: शून्य शब्द येतो. पण निवृत्तीनी त्या अर्थी हा शब्द वापरला नाही. गौतम बुद्धाने विश्वाचे कोडे उलगडणारा जो कार्यकारणभाव सांगितला त्याला प्रतीत्य समुत्पाद म्हणतात त्याअर्थी विदर्भातील ब्राम्हण (बौद्ध नाव नागार्जुन) याने शून्य संज्ञा वापरली आहे. त्या शून्याची निषेधात्मक व्याख्या अशी आहे.

**अनिरोधम् अनुत्पाद, अनुच्छेदम्, अशाश्वतम् ।**
**अनेकार्थम्, अवानार्थम्, अनागम्यम्, अनिर्गमम् ॥**

अशी माध्यमिकवृत्तिमध्ये व्याख्या दिली आहे ती येथे लागू होत नाही. आणखी एक शून्य वादी व्याख्या.

शून्यमिति न वक्तव्यमशून्य मिति वा भवेत् ।
उभयम् नोभयंचैव प्रज्ञाप्यर्थं तु कश्यते ।

ही येथे उपयोगी नाही नाथसांप्रदायाचे पूर्वी, त्याचे एकाअर्थी उगमस्थान, बौद्ध विज्ञानवाद. त्या सांप्रदायाची शून्याची व्याख्या

**न सन् चासन् न तथा न चान्यथा ।**
**ना नायते व्येति न चावहीयते ।**
**न वर्धते नापि विशुध्यते पुन:**
**विशुद्धते तत्पर मार्थलक्षणम् ॥**

वास्तवता कशी आहे याचे हे वर्णन आहे. पण निवृत्तींनी 'ते आहे, ते नाही, किंवा आहे-नाही पेक्षा निराळे नाही' इ. कोडे पडणारी संज्ञा या अभंगात योजली नाही.

नाथ सांप्रदायात 'शून्य' शब्दपुढील अर्थी येतो.

१) नाद, परमतत्त्व, परमज्ञान
२) ब्रह्मरंध्र, दशमद्वार, सहस्त्रार कमल
३) शिवलोक (उदा. गोरक्ष पद्धतीत पृ. ८८) म्हटले आहे.

शून्य प्रविशति गगने यत्र देवो महेश :

ज्या ठिकाणी भगवान महेश आहे तेथे आकाशात शून्य प्रवेश करते (एका आध्यात्मिक अनुभवाचे वर्णन)

संत साहित्यात जवळ जवळ त्याच अर्थी 'शून्य' संज्ञा येते.

१) नाद (अनाहृत) परमतत्त्व, परमज्ञान
२) ब्रह्मरंध्र, सहस्रार कमळ
३) परमलोक

शून्य शब्दाचे असे कितीतरी अर्थ व अर्थच्छटा आहेत त्यापैकी कोणत्या अर्थी निवृत्तिनाथ

शून्य तैं पुशिले निरशून्य बिंबले । ब्रह्म उगवले तेजाकार

हा आपला आध्यात्मिक अनुभव कथन करतात ? मी याचा अर्थ असा करतो.

शून्य (नाद, अनाहृत नाद) थांबला (बंद झाला) आणि नादापलिकडे (नादातीत) अवस्था प्राप्त झाली आणि त्यानंतर तेजाकार ब्रह्म स्वरूप प्रगट झाले (दिसले, अनुभवास आले) वाचकांनी अधिक चांगला अर्थ कळवावा ही विनंती.

ज्यांनी महाराष्ट्राला ज्ञानेश्वरासारखा संत दिला आणि स्वत: अज्ञात राहिले, वडील गेल्यानंतर वडिलकीच्या नात्याने कोरान्न मागण्यापासून सर्व बाबतीत भावंडांचा सांभाळ केला, ज्ञानदेवाना आपल्या सांप्रदायाचे तत्त्वज्ञान मांडणारे अमृतानुभवासारखा ग्रंथ लिहिण्यास प्रवृत्त केले, असे अज्ञात राहून महाराष्ट्र भाषेला वैभव, ज्ञानेश्वरी, अमृतानुभवासारखे अलंकार वाढवले त्या महापुरुषाला आज त्याच्या सातशेव्या (७००) पुण्यतिथीला अभिवादन करू या.

ooo

# गीता भागवत । मुख्यतः हेच दोन ग्रंथ ।

— ❖ ❖ ❖ —

श्री साईबाबांच्या आज्ञेने साईभक्त जोग रोज दुपारी शिर्डीतील वाड्यात गीता भागवतावर प्रवचन करीत. बाबा दर्शनास येणाऱ्या भक्तांना त्यावेळी प्रवचन ऐकण्यास वाड्यात जाण्याची आज्ञा करीत. हे दोन्ही ग्रंथ श्रीकृष्णांशी संबधित आहेत. गीता कृष्णअर्जुन संवाद आहे तर भागवतातील एकादश स्कंध कृष्ण उद्धव संवाद आहे. ती दद्धवगीता म्हणूनही प्रसिद्ध आहे. या विषयी साईसच्चारितातील ओव्या चिंतनीय आहे.

— ❖ ❖ ❖ —

ओतां थोडीसी उपकथा । ओघास आली न ये टाकितां ।
श्रोतां परिसावी सादरतां । या नाथभागवतासंबंधें ॥
तें हें नाथभागवत । गुरूभक्तिरसें परिल्पुत ।
साईकृपापात्र भूत । नित्य दीक्षित वाचिती ॥
जगदुद्धाराचिया कारणें । ब्रम्हाठायीं जें नारायणें ।
पेरिलें तें मग नारद क्षेत्री त्यानें । बीज आणिलें कणसासी ॥
जया क्षेत्राची दशलक्षणी । केली संवगणी बादरायणीं ।
शुकें परीक्षितीच्या खळ्यांत मळणी । केली निवडणी कणसांची ॥
स्वामी श्रीधरें मारलें हडप । स्वामी जनार्दनें केलें माप ।
रसभरित पक्वान्नें उमाप । नाथप्रताप भोजन ॥
स्कंध एकादश त्यांतील जाण । भक्तिप्रेमसुखाची खाण ।
तें हें बत्तीसखणी वृंदावन । नित्य वाचन दीक्षितां ॥
दिवसा तयाचें करिती निरूपण । रात्रौ वाचिती भावार्थरामायण ।
हाही ग्रंथ गुर्वाज्ञा म्हणून । जाहला प्रमाण दीक्षितां ॥
भक्ति सुखामृताचें सार । ज्ञानेश्वरीचा द्वितीयावतार ।
तो हा नाथांचा मूर्त उपकार । महाराष्ट्रावर उदंड ॥
करोनियां प्रात:स्नान । नित्यनेम साईपूजन ।
अन्य देव देवतार्चन । नैवेद्य नीरांजन उरकतां ॥
मग श्रोतांसमवेत सविस्तर । पय:प्रसाद अल्पाहार ।
सारोनि नित्यक्रमानुसार । पोथी सादर वाचिती ॥
जया गोडिये सहस्त्र पारायणें । भगवत्परायण तुकारामानें ।
केलीं भंडाऱ्यावर एकान्तपणें । ते गोडी कवणें वर्णावी ॥
हा महाप्रासादिक दिव्य ग्रंथ । दीक्षित शिष्य निष्ठावंत ।
म्हणोनि जीवांच्या उद्धारार्थ। साईसमर्थ आज्ञापिती ॥
जाणें नलगे वनाप्रती । भगवंत प्रकटे उद्धवगीतीं ।
श्रद्धायुक्त जे पारायण करिती । भगवत्प्राप्ति रोकडी ॥
भारतीं संवाद कृष्णार्जुनांचा । त्याहूनि सरस हा कृष्णोद्धवांचा ।
तो या भागवती उपदेश साचा । प्रेमळ वाचा नाथांची ॥
असो ऐसा हा प्रासादिक ग्रंथ । ज्ञानदेव भावार्थदीपिका समवेत।
समर्थ कृपाळू साईनाथ । वाचवीत नित्य शिरडींत ॥
सखाराम हरी जोग । तयांस हा बाबांचा नियोग ।
साठ्यांचे वाडियांत हा योग । भक्तां उपयोग हा मोठा ॥
प्रत्यहीं या ग्रंथाचें श्रवण । बाबा कित्येक भक्तांलागून ।
श्रवण करविती कळवळून । भक्तकल्याणवांछेनें ॥
अगाध बाबांची अनुग्रहकुसरी । भक्तां उपदेशिती परोपरी ।
भक्त जवळीं बा देशांतरीं । बाबा अंतरीं सन्निधचि ॥
आपण जरी मशिदीं बसती । कोणाही कांहीं कार्य नेमिती ।
तयासी देऊनियां निजशक्ती । करवूनि घेती तें कार्य ॥
बापूसाहेब जोगांप्रत । वाड्यांत पोथी वाचाया सांगत ।
ते ती वाचीत नित्या नेमस्त । श्रोतेही येत ऐकाया ॥
जोगही दुपारा भोजनांतीं । नित्य जाऊनि बाबांप्रती ।
चरण वंदूनि घेऊनि विभूति । आज्ञापन घेती पोथीचें ॥
कधीं वाचीत ज्ञानेश्वरी । कधीं ते नाथभागवतावरी ।
पारायण मांडीत आनंदनिर्भरीं । व्याख्यान करीत अर्थाचें ॥
ऐसी अनुज्ञा झालियापाठीं । भक्त जे येती बाबांचे भेटी ।
कितीएकां पोथी ऐकावयासाठीं । उठाउठी पाठवीत ॥
कधीं सांगत संक्षिप्त गोष्टी । श्रोता जों सांठवी निजकर्णसंपुटीं ।
तोंच बाबा म्हणती जा उठीं । त्या पोथीसाठी वाड्यांत ॥
श्रोता भावार्थी पोथीस जातां । निघावी पोथींतही ऐसीच कथा।
कीं जी पूर्वील कथेची दृढता । अर्थावबोधकता पूर्ण करी ॥
ज्ञानेश्वरांची ज्ञानेश्वरी । अथवा एकनाथांची वैखरी ।
बाबांच्या कथेचाच अनुवाद करी । श्रोतयां नवलपरी ही मोठी ॥
एकाद्या पोथीचा विवक्षित भाग । वाचावा ऐसा नसतांही नियोग ।
पूर्वनिवेदित गोष्टीचा सुयोग । पोथींत जोग वाचीत ॥
भगवन्दीता भागवत । मुख्यत: हेच दोन ग्रंथ ।
भागवतधर्माचें सारभूत । जोग हे नित्य वाचीत ॥
गीता ज्ञानेश्वरी टीका । जया नांव भावार्थदीपिका ।
भागवत एकादशस्कंध निका । परमार्थभूमिका नाथांची ॥

०००

# घडीने घडी साधावी !

डॉ. अशोक प्रभाकर कामत
(प्राध्यापक-प्रमुख संत नामदेव अध्यासन पुणे)

(लेखांक ३ रा)



— ❖ ❖ ❖ —

**तुकोबांच्या जीवनकाळात अनेक नैसर्गिक आपत्ती आल्या. मानवी गुणदोषामुळेही बरीच संकटे त्यांच्यावर आली. पण तुकोबांनी आपले मन सदैव प्रसन्न ठेवले. देवाचा नित्य धावा करणे, त्यावर सारा भार टाकून निश्चिंत मनाने नित्याचे व्यवहार करणे अशी त्यांची पद्धती होती. मुक्त मनाने त्यांनी निरंतर देवानुभव घेतला. मुक्तीच त्यांची सहधर्मचारिणी ठरली. त्यांची अत्युच्च सुखाची कल्पनाही लोकविलक्षण होती. प्रस्तुत लेखात ती त्यांच्याच अभंगांतून स्पष्ट करून दाविली आहे.**

— ❖ ❖ ❖ —

महाराष्ट्रात पडलेला एक भयंकर दुष्काळ १६३० च्या सुमाराचा आहे. याचवेळी तुकोबांच्या जीवनप्रवासाला विलक्षण कलाटणी मिळाली असावी. त्यांचा एक अभंग असा मिळतो :

**संवसारतापे तापलो मी देवा ।**
**करिता या सेवा कुटुंबाची ॥**
**म्हणूनी तुझे आठविले पाय ।**
**ये वो माझे माय पांडुरंगे ॥**
**बहुता जन्मींचा जालो भारवाही ।**
**सुटिजें हे नाही वर्म ठावे ॥**
**वेढियेलो चोरी अंतर्बाह्यात्कारी ।**
**कणव न करी कोणी माझी ।**
**बहु पागविलो बहु नागविलों ।**
**बहु दिवस जालो कासाविस ॥**
**तुका म्हणे आता धाव घाली वेगी ।**
**ब्रीद तुझे जगी दीननाथ ॥**

संसारातील तापत्रासांबद्दल येथे तुकाराम महाराज आपल्याला सांगताहेत : माझ्या वाट्याला कितीतरी अडचणी आल्या. माझ्या घरच्या मंडळींची सेवा करता करता मी अगदी थकून गेली आणि त्यातूनच मला देवाजीचे पाय आठवले. मी श्री विठ्ठलाला मनापासून शरण गेलो. तो मला माझ्या मातेसारखा आहे. त्याला मी हाक दिली... ''माय पांडुरंगे, तु माझ्यासाठी अगदी लवकर धावून ये.'' मी त्याला माझं मन उघडं करून म्हणालो...

आजवरच्या अनेक जन्मात जे काही पापपुण्य झाले त्याचे मोठे ओझेच आहे. मी त्यानं दडपून गेलो आहे. त्यातून बाहेर कसं पडायचं, मला कळत नाही. आतून नि बाहेरून चोरांनी घेरावं, तसं झालंय माझं ! कुणालाही माझी दया नाही येत. मी अगदी दुबळा होऊन गेलोय. माझी बरीच फसवणूकही झालीय. मी अगदी कावराबावरा झालोय. आता तूच यातून मार्ग कसा काढायचा ते सांग. मला ठाऊक आहे देव दीनानाथ असतो. दुबळ्यांचं रक्षण हे त्याचं ब्रीदच असतं. त्यानं आता लवकर धावून यायला हवं. मला सांभाळून घ्यायला हवं.

या आर्त अभंगात महाराज स्वत:बरोबरच आपल्यालाही आश्वस्त करतात. संसाराचे ओझे वाहावे लागतेच. 'अनंताविना दुसरा कुणी आधार नाही,'' या भावाने पाहिले तरच ते ओझे थोडे सुसह्य होते. 'फटकळ हा संसार । येथे सार भगवंत'' हे खरे सत्य आहे.

अन्यत्रही महाराजांनी आपल्या सांसारिक दुःखाबद्दल सांगितलेले आहे. पण त्याचबरोबर 'पंढरीची वारी आहे माझ्या घरी' अशी आपली जीवनरीतीही स्पष्टपणाने नमूद केलेली आहे.

**।। आकाश मंडप पृथ्वी आसन ।।**

तुकोबा लहानग्या देहू गावातच राहिले. शेतकरी कष्टकरी हेच त्यांचे लहानपणापासून सवंगडी. गाई गुरांची देखभाल करावी, शेतीची मशागत करावी, कधी विटी दांडू खेळावा. सूरपारंब्या खेळून मस्ती करावी. म्हटलंय त्यांनी...

**बाळपणी ऐसी वरुषे गेली बारा ।**
**खेळता या पोरां नाना मते ।।**
**विटीदांडू, चेंडू, लगोऱ्या, वाघोडी ।**
**चंपे, पेंड, खडी, एकीबेकी ।।**

कधी भगवान श्रीकृष्णासारखं रानावनात जाऊन गाई म्हशींना चारावं. तिथं खेळावं.

**चला वळू गाई । दूर अंतरल्या माई ।**
**खेळ खेळता जाणा शीण । कोण करी वणवण ।।**
**गाई हकारी कान्ह्या । म्हणोनि लागती ते पाया ।।**
**तुका म्हणे द्यावे । नाम संकीर्तन बरवे ।।**

यातून तुकोबा अंगापिंडानं दणकट झाले. आयुष्यभर संकटांशी सामना करू शकले. त्यांचं खरं शिक्षण समाजाला जवळून पाहूनच झालं. रानावनातील पशुपक्षीही त्यांना मित्र वाटले. त्यांच्यापासूनही त्यांनी अनेक गोष्टी शिकून घेतल्या. मग त्यांना सगळ्या माणसांविषयी, जगातल्या प्रत्येक गोष्टीविषयी मायाममता वाटू लागली. म्हणूनच तर ते म्हणाले :

**वृक्षवल्ली आम्हां सोयरी वनचरे ।**
**पक्षी ही सुस्वरे आळविती ।।**
**येणे सुखे रूचे एकांताचा वास ।**
**नाही गुण दोष अंगा येत ।।**
**आकाश मंडप पृथिवी आसन ।**
**रमे तेथे मन, क्रीडा करी ।।**
**कथाकुमंडल देह उपचारा ।**
**जाणवितो वारा अवसरू ।।**
**हरिकथा भोजन परवडी विस्तार ।**
**करोनि प्रकार सेवू रूची ।।**
**तुका म्हणे होय मनासी संवाद ।**
**आपुलाचि वाद आपणांसी ।।**

रानावनात पशुपक्षी असतात. गुण्यागोंविदाने राहतात. त्यांना कोण शिकवतो ? कोण सांभाळतो ? त्यांचेकडे प्रेमाने पाहावे. खूप शिकता येते.

आकाशाचा मोठाथोरला मंडप घातलेला आहे. ही भलीमोठी भूमाता आहे. पृथ्वी आहे. हे सारे देवाने साऱ्यांना दिले आहे. त्याकडे मजेने पाहावे आणि चांगले वागावे. दुःखे कोसळतात तशीच सुखेही सापडतात. त्यासाठी सृष्टीकडे स्नेहप्रेमाने पाहण्याची दृष्टी, शक्ती हवी. संकटकाळ आला तर खचून भिजून जाता कामा नये. एकदम काही वेडेवाकडे बोलून वा विचार करून चुकीचे पाऊल टाकणे योग्य नव्हे. सुखसंतोष गवसला तर हुरळून न जाता आनंदाने इतरांचा आनंद वाढवायला हवा. यासाठी मनाशी केलेला संवाद उपयोग ठरतो. तुकोबा हा सारा आपला आपल्याशीच संवाद साधीत आपल्या वाट्याला आलेले सारे सुखदुःख सहजपणे सांगत राहतात.

मनाला मोठे महत्त्व आहे. देवाने माणसाला ती एक मोठीच देणगी दिलेली आहे. आपण सगळे मनाने विचार करू शकतो. चांगले वाईट ठरवू शकतो. इतरांशी वाद करण्यापेक्षा मनाशी करावा. त्याला सतत प्रश्न विचारावे. संवाद करावा.

असे केले की, दुःख संपते आनंदच आनंद मिळत राहतो.

अशी आपला आपल्याशी संवाद करण्याची तुकोबांची सवय विलक्षण होती. ते अवतीभवतीच्या निसर्गाकडे बारकाईनं पाहात. लोकांची भाषा, त्यांचे वाद, त्यांच्या आवडीनिवडी, त्यांचे रीतिरिवाज हे सगळं निरखीत. आदर्श वारकऱ्याप्रमाणं रोज ज्ञानेश्वरी वाचीत. हरिपाठ म्हणत. संत नामदेवांची अभंगगाथा वाचीत. एकनाथमहाराजांचे भावार्थ रामायण, भागवत, गाथा, प्रकरणग्रंथ हे सारं साहित्य वाचीत. कबीरदासांचे दोहे म्हणत. पदे गात. गावात अथवा जवळच्या गावी कुठं कथाकीर्तन असलं, प्रवचन असलं तिथं जात. अनेक फिरते साधुसंन्यासी येत. त्यांच्याशी चर्चासंवाद करीत. ही त्याची गोडी इतकी वाढली की, अनेक संतांची कवनं अगदी पाठ झाली. त्याचा अर्थ लागला. मग ओठावर गाणं जुळून यायला लागलं.

घरीच दुकानदारी-महाजनकी असल्यामुळे हे लिहाय-वाचायला आधीच शिकले होते. पुढे संकटकाळी काही वेगळंच लिहायलाही शिकले. त्यांना वाटू लागलं.

**वेदांचा तो अर्थ आम्हासीच ठावा ।**
**येरांनी वाहावा भार माथा ।।**

आपल्या देशातील नव्हे जगातील जुन्यात जुने ज्ञानविज्ञानाचे ग्रंथ वेद. त्याकाळी ठराविक लोकच या ग्रंथांचं वाचन मनन करायचे. ते ठराविक भाषेत म्हणजे संस्कृतमध्ये चालायचं. तुकोबांनी ठरविलं, ज्ञानदेव-नामादेवांप्रमाणे, एकनाथ-रामदासांप्रमाणे लोकांच्या बोलीभाषेत त्यांना ज्ञान द्यायचे. नुसते ज्ञानाचे ओझे कोणी वाहात राहू नये.

ज्ञान द्यावे, ज्ञान घ्यावे, ज्ञान संपत नाही. ते निरंतर वाढत राहते. आणि मग मोठ्या आत्मविश्वासाने ते सतत येणाऱ्या अडीअडचणींचा गुमान न बाळगता देवाचा धावा करीत राहिले. अवतीभवतीचे जीवनही उजळू लागले.

**देवाचा धावा**

आरंभीच्या साक्षात्कारपूर्व काळामध्ये देहूशेजारचा भंडारा डोंगर तुकोबांचा मित्रच होऊन गेला होता. ते मोठं रमणीय स्थान होतं. थकल्या-भागल्यावर तिथं येऊन बसावं, वाचावं, संतांचं जीवन आठवावं. तासन्तास निघून जायचे. असंच एकदा तुकोबा इथं येऊन बसले. नेहमीप्रमाणे देवाशी संवाद करू लागले. त्यांनी म्हणे धरणेच धरलं. ''देवा, तुमची-माझी भेट होऊ दे''असं म्हणत राहिले. भजन गात राहिले.

**लुटो हे शरीर तुटो हे मस्तक।**
**नामाचा गजर सोडू नये॥**

अशी देवाची प्रार्थना गात विचार करीत बसले. रात्र झाली. दुसरा दिवस उगवला. चांगले पंधरा दिवस आले आणि गेले. तुकोबांना तहान नाही. भूक नाही. एकच ध्यास. देव आपल्याला समजला पाहिजे. इकडे घरात सारे काळजीनं व्याकुळ झाले. तुकोबा गेले तरी कुठे ? सगळीकडे शोधाशोध केली. पत्ता लागला नाही. जिजाबाई चिंतेने व्याकुळ झाली. मुलंबाळं तोंड लहान करुन बसली. गावकरीदेखिल चिंता करायला लागले.तुकोबा गेले कुठे ?

तुकोबा आपले भामगिरीच्या गुहेत समाधी लावून होते. एके दिवशी त्यांची इच्छा पुरी झाली....

**पंधरा दिवसांमाजी झाला साक्षात्कार।**
**विठोबा भेटला निराकार॥**
**भामगिरी पाठारी वसती जाण केली।**
**वृत्ती स्थिरावली परब्रह्मी॥**

या अवघड काळात काय नाही झालं ? सर्पविंचू व्याघ्र अंगाला डसले. पण अखेर समजलं: देव सगळीकडे आहे. त्याचा शोध आपल्यालाच, अवतीभवतीच आपला आपणच घ्यावा. त्यासाठी नाकडोळे बंद करायला नको. रानीवनी भटकायला नको. जटादाढी वाढवायला नको. देव नाही अशी जगात एकही जागा नाही. देव प्रत्येक वस्तूत आहे तो पाहावा म्हणजे अहंकार जातो. आनंद मिळतो.

असा शोध लागल्यावर तुकोबा अत्यंत आनंदून गेले. त्यांना वाटले हे आधी देवालाच सांगू या. मग ते पुन्हा भजनात रंगून गेले :

**सर्व भावे आलो तुजेची शरण।**
**काया वाचा मनासहित देवा॥**
**आणिक दुसरे न ये माझे मना।**
**राहिली वासना तुझे ठायी॥**

देवा ! मी आता सगळीकडे तुलाच पाहतो आहे. माझं बोलणं, चालणं, वागणं सारं काही तुझ्यासहच असणार आहे. मी जिथं जाईन तिथं मला तू सांगाती होशील. सोबत करशील :

**तुझे आम्ही दास आमचा तू धनी।**
**चालत दुरुनी आलों मागें॥**
**तुका म्हणे आता घेतले धरणे।**
**हिशोबाकारणे भेटी देई॥**

मग तुकोबांनी ठरविले ही जी आपल्याला एक नवी वाट दिसली ती आधी गावकऱ्यांना दाखवू या. त्यांचाही आनंद वाढेल.

**॥ चालवीसी हाती धरोनिया ॥**

जेव्हा गावकऱ्यांना कळलं, तुकोबा तहानभूक विसरुन दोन आठवडे गुहेत बसून होते, तेव्हा ते फार थक्क झाले. कुणी विचारलं, वाघाचं भय नाही ? तुकोबांनी साऱ्यांना शांत केलं म्हणाले :

**चित्त शुद्ध तरी शत्रु मित्र होती।**
**व्याघ्र हे न खाती सर्प तया।**
**विष ते अमृत आघात ते हित।**
**अकर्तव्य नीत होय त्यासी॥**

आपलं मन स्वच्छ करावं. मग शत्रूचीही मैत्री होऊन जाते. सापविंचू आणि वाघसिंहच काय, कोणाचीच भीती वाटत काही दिसतच नाही. वाईट काही दिसतच नाही. हे जग सगळ्यांचे आहे. प्रत्येकापाशी काही गुण असतोच. आपण तो ध्यानात घ्यावा. चांगल्याला चांगलंच दिसतं. चांगल्या मार्गावर असलं की सगळं चांगलं होतं.

तुकोबा असं छान बोलू सांगू लागले. गावकरी म्हणाले, तुम्ही आम्हाला रोज काहीतरी सांगा. तुकोबा कीर्तन करु लागले. गोड अभंग म्हणू लागले. चांगलं गाणं गाताना ते नाचू लागले. लोकही नाचू लागले. येणारा प्रत्येक दिवस ज्ञानाचा नवा प्रकाश देणारा ठरू लागला. देहू गावच नाही, आजूबाजूच्या अनेक गावातून तुकोबा पोहोचले. लोक जमले की, तुकोबा रोज कीर्तन करीत.ते सांगत :

परमेश्वराचा ठावठिकाणा केवळ देवाच्या मूर्तीत नाही. तो सदा सगळीकडे आहे. प्रत्येक चांगल्या गोष्टीत तो आहे. सृष्टीत सर्वत्र आहे. त्याच्याच शक्तीने आपले सगळे चांगले होते. चालताना, बोलताना काहीही करताना त्याचा आपल्याला आधार आहे. असा विश्वास मात्र हवा. मग आपण करतो त्याला फळ येते.

**तुकोबांना सतत अनुभवच येऊ लागला म्हणून ते अभंग गाऊ लागले :**

**जेथे जातो तेथे तू माझा सांगाती।**
**चालवीसी हाती धरोनिया ॥**
**बोलो जाता बरळ करितो ते नीट।**
**नेली लाज धीट केलों देवा ॥**

तुकोबांना केवळ असा आधार आणि आत्मविश्वासच मिळाला असे नव्हे. त्यांना सारी माणसं जिवाभावाची वाटू लागली. माणसाला आधार माणसाचा म्हणून माणसानं प्रत्येक माणसाशी गोड वागलं - बोललं पाहिजे. म्हणजे जीवन अत्यंत आनंदाचं होऊन जातं. कोणतीच काळजी राहात नाही :

**अवघे जन मज झाले लोकपाळ।**
**सोइरे सकळ प्राणसखे ॥**
**तुका म्हणे आता खेळतो कौतुके।**
**झाले तुझे सुख अन्तर्बाह्य ॥**

आता तुकोबा साऱ्या विश्वाचे मित्र झाले. सगळीकडे त्यांना देवत्वाची प्रचीती येऊ लागली. मग त्यांनी एक नवा निश्चय केला. **''सेवितो हा रस। वाटितो अनेका।''** ''तुका म्हणे मज धाडिले निरोपा। मारग हा सोपा सुखरुप''. माझा देवच मला सांगतो आहे, तू लोकांना सोपा साधा मार्ग दाखव. तुला जे सुख मिळाले ते साऱ्यांना दे. आपल्याला जे मिळाले ते एकट्याने खाऊ नये. वाटून खावे. म्हणजे आनंद वाढत राहतो. असेच विचार आपल्याला नामदेव - नानकदेवांच्या भजनांतून वाचायला मिळतात. तुकोबांना ते निश्चितच ज्ञात होते.

## ॥ तृप्त मन:स्थिती ॥

तुकोबांच्या प्रपंचात ज्या नैसर्गिक आणि एकूण ग्राम जीवनामुळे अडचणी आल्या त्या हळूहळू शमल्या. एका तृप्त मन:स्थितीत तुकोबा वावरू लागले. ते आधीही दु:खीकष्टी झाले नव्हते. पण इतरेजनांची दिङमूढ अवस्था त्यांना सतावत राहिली. किंबहुना तीच त्यांच्या कवनातून प्रकटत होती.

तुकोबा मुक्त मनाने देवानुभव घेऊ लागले. मुक्तीच त्यांची सहधर्मचारिणी बनली. ईश्वरप्रेम रोमरोमात भरून गेले. मग ओठावर अभंगही अवतरत राहिले असाच हा अभंग...

**याजसाठी केला होता अट्टहास।**
**सेवटीचा दिस गोड व्हावा ॥**
**आता निश्चितीने पावलो विसावा।**
**खुंटलिया धावा तृष्णेचिया ॥**
**कवतुक वाटे जालिया वेचाचें।**
**नाव मंगळाचे तेणें गुणें ॥**
**तुका म्हणे मुक्ति परिणिली नोवरी।**
**आता दिवस चारी खेळीमेळी ॥**

तुकाराममहाराजांच्या वाट्याला लौकिक-व्यावहारिक अथवा सांसारिक जीवनातले अनेक दु:खं आली तरी त्यांनी भगवद्भक्तीने त्यावर जय मिळविला. ''तुका म्हणे आम्ही जिंकिला संसार। होऊनि किंकर विठोबाचे।'' असा त्यांना आनंद होता. मनाची तगमग थांबवून त्यांनी द्वैतभावच नाहीसा केला. साऱ्या शंका वासना निमाल्या. अस्थिरता संपली. ''शांतीच्या संयोगे निरसला ताप'' असे होऊन गेले. मग ''पाहे तिकडे सारिखें। आपुलें पारिखें निरसले'' अर्थात जिकडे पाहू तिकडे सर्वत्र एका ईश्वराचेच रुपसान्निध्य आहे. हे आपलं, ते दुसऱ्याचं असं आता काही नाहीच.

अशा अत्यंत समाधानी, तृप्त मन:स्थितीत महाराजांनी आपले अभंग म्हटले. अगदी आयुष्याच्या अखेरीपर्यंत ते देवाचं गाणं गात - पाहात राहिले. म्हणाले :

आपल्या जीवनाच्या अखेरीचे दिवसही अत्यंत आनंदाचे नि सुखासमाधानाचेच व्हावेत. यासाठीच तर सारी खटपट असते. आमची सुद्धा तशीच होती. ईश्वराचं सान्निध्य सतत मिळावं यापरतं अन्य सुख कोणतं ?

माझे म्हणाल तर... आता मी अगदी निश्चिंत झालोय. संतोष तृप्तीनं विश्रांतीचं सुख अनुभवतो आहे. आता कोणतीही अभिलाषा नाही. तृष्णा नाही. हाव नाही. म्हणून धावाधावही नाही. आपलं सारं आयुष्य भगवंताच्या

नामचिंतनात खर्च झालं, त्याचं नित्यसान्निध्य मिळविता आलं, याचं मनोमन फार समाधान आहे. यात माझं कसलं कौतुक? त्या मंगल ईश्वरनामाचाच हा खरा प्रभाव.

पुढं तर महाराज विनोदानंच म्हणतात : ''मुक्ती - हीच नवरी म्हणून मानली आणि मी तिच्याशी सुखसंतोषानं संसार केला म्हणाना. आता उरलेले चार दिवस तिच्याच आनंदाच्या सहवासात जरा अधिक खेळीमेळीनं जाणार आहेत.''

महाराजांनी इथं स्पष्टीकरणासाठी घेतलेलं रुपक मोठं बहारीचं आहे. उतारवयात मुक्तीशी विवाहविधी. महाराज ''याचि देही याचि डोळा'' सदासर्वत्र मुक्तीचा सोहळाच पाहात जगले. अगदी क्षण येईपर्यंत. त्यामुळं त्यांची वाणी इथूनतिथून समाधानानं ओथंबलेली आहे.

## ॥ मन करा रे प्रसन्न ॥

देवाचा सहवास मिळाल्याचं सुख तुकोबांना इतकं प्रसन्न करून गेलं की, त्याचं सारं जीवनच बदलून गेलं. त्यांनी घरी होतं नव्हतं ते सारं खर्च केलं नि विठूरायाचं घराजवळचं पडकं देऊळ नीट बांधून काढलं. म्हणाले, आपल्याला भजन - कीर्तनाला निवांत जागा झाली. गावच्या माणसांना यायला बसायला चांगली सोय झाली.

काही जणांनी तुकोबांना या कामात प्रेमाने मदत केली. काही मंडळींनी त्यांची टिंगलटवाळीही केली. म्हणाले घरी धड खायला नाही, कपडालत्ता नाही आणि सारं विकून हा माणूस देवाची भर करतोय. तुकोबांनी हे ऐकले आणि इतकंच बोलले :

**कोणी निंदा कोणी वंदा। आम्हां स्वहिताचा धंदा॥**
**तुम्हासारिखे चालावे। तेव्हा स्वहिता मुकावे॥**

कधी लोक तुकोबांना आपुलकीनेही विचारायचे: ''बुवा तुम्ही भारी साधे. आपला, घरादाराचा, मुलाबाळांचा विचार करीतच नाही. बघावं तेव्हा लोकांचा विचार करता. तुमचं कसं व्हायचं ?

बुवा कीर्तनाला असाच काही विषय मग घ्यायचे. समजावून सांगायचे. गाऊ लागायचे.

**जे का रंजले गांजले, त्यांसि म्हणे जो आपुले।**
**तोचि साधु ओळखावा, देव तेथेचि जाणावा॥**
**ज्यासी अपंगिता नाही, त्यासी धरी जो हृदयी।**
**दया करणे जे पुत्रासी, तेच दास आणि दासी॥**

तुकोबांना मनापासून वाटायचं, जगात कितीतरी माणसं दु:खी कष्टी आहेत. अनेकांना पोटभर अन्न मिळत नाही. अंगभर कपडा असत नाही. राहायला नीट घर नसतं. पुष्कळांना काही अवयव कमी असतात. कुणी अंधळा, पांगळा, मुका, बहिरा असतो. त्यांना आधार द्यावा. त्यामुळं जग सुखी व्हायला मदत होईल. आपणही आपलं मन स्वच्छ निर्मळ करीत राहावं. चांगल्या गोष्टी ऐकाव्यात आणि कराव्यात. त्यामुळे मनाला शांती मिळते. प्रसन्नता येते. हाच खरा सुखाचा मार्ग...

**मन करा रे प्रसन्न, सर्व सिद्धीचे कारण।**
**मने प्रतिमा स्थापिली, मनें मना पूजा केली॥**
**मन गुरु आणि शिष्य, करी आपुलेचि दास्य।**
**प्रसन्न आप आपणांस, गति अथवा अधोगती॥**

माणसाचं वेगळेपण काय? त्याला इतर प्राण्यांपेक्षा अधिक कळतं. समजतं. चांगलं काय, वाईट काय याचा अनुभव घेता येतो. बोलता सांगता येते. हे सारे केवळ बुद्धीने होते काय? बुद्धीपेक्षा मन मोठं. त्याला प्रथम आनंदी करायला हवं. तसे झाले की सारे मिळते. कारण मन जर ताब्यात असले तरच चांगल्याची भेट होते. सद्गुरू मिळतात. वाईटाकडे ओढा जात नाही. चांगल्याची आवड निर्माण होते. म्हणून मन प्रथम प्रसन्न ठेवावं. मग ते विशाल होतं. खूप मोठं होऊन जातं. सारं जग त्यात मावायला लागतं.

तुकोबांनी आपलं मन आकाशाएवढं स्वच्छ केलं. खूप मोठं केलं. अगदी आकाशाएवढं केलं आणि मग ते आनंदाच्या लाटांवर मजेत पोहू लागले.

तुकोबांची जीवनयात्रा खटपटी धकाधकीची नाही. ते जे करतात ते सहजपणाने करतात. आले वाट्याला घर नि परिवार ते त्यांनी मनापासून आपले म्हटले. पण त्यात ते गुंतून गेले नाहीत म्हणून कुणी कायमचे गेले, सोडून गेले, जवळचे असून दूरच्यासारखे वागले. तुकोबांचे काही बिघडले नाही. सुखे होती. दु:खेही येत राहिली होती. तुकोबांची सुखदु:खाची व्याख्याच वेगळी होती. नव्हे, त्यांनी जी अत्युच्च आनंदसुखाची कल्पना केली, तीच मुळी विलक्षण होती. या अभंगात ती आढळेल.

**निर्वाहापुरते अन्न आच्छादन।**
**आश्रमासी स्थान कोपी गुहा॥**
**कोठेही चित्तासी नसावे बंधन।**
**हृदयी नारायण साठवावा॥**

**नये बोलो फार बैसों जनामधीं ।**
**सावधान बुद्धी इंद्रिये दमी ॥**
**तुका म्हणे घडी घडीने साधावी ।**
**त्रिगुणांची गोवी उगवूनि ॥**

तुकाराममहाराजांच्या अल्पायुष्यात अनंत अडीअडचणी आल्या. पण त्यांनी सांसारिक, प्रापंचिक, सुखदु:खापेक्षा परमार्थ, देवानुभव यांना अधिक महत्व दिलं. ''मन करा रे प्रसन्न। सर्व सिद्धीचे कारण'' हा त्यांचा जीवनमंत्र होता. ''सत्य असत्यासी मन केले ग्वाही। मानियले नाही बहुमता'' अशी त्यांची स्वत:ची विचारसरणी होती.

साध्या, सोप्या अभंगात त्यांनी सुखकल्पनाच स्पष्ट केलेली आहे. मानवी जीवनातला खरा आनंद कुठं शोधता येतो? भौतिक सुखसुविधा मिळविण्यानं संतोष मिळतो काय? भरपूर खाणंपिणं मिळालं - दागदागिने उंची वस्त्र मिळाली - उत्तम घरदार, जमीनजुमला आला की प्रसन्नता मिळू शकते का? महाराजांची उत्तरं अशी आहेत : **''नको देऊ देवा द्रव्य आणि भाग्य। तोचि एक उद्वेग होय जीवा।''** भाग्य श्रीमंतीबरोबर नसत्या चिंताच येतात. उलट फकिरी बाणा स्वीकारला तर निश्चिंतता तर येतेच, पण श्रीहरीशी सुद्धा सतत जवळीक राहते. **''तुका म्हणे करी फकिराचे परी। रात्रंदिवस हरि येईल वाचे''** हे सारं जाणूनच महाराज आपली सुखकल्पना सांगतात.

''निर्वाहापुरते अन्न आच्छादन'' उदरनिर्वाह होईल, पोटाला अगदी आवश्यक तितके अन्न आणि ज्यामुळं शरीराचं रक्षण घडेल इतका कपडा पुरे होतो. एखाद्या गुहेत राहता येतं. खोपटातही राहिल्यानं भागतं. एक मात्र हवं... कुठल्याही गोष्टीबद्दल मनात आसक्ती असू नये. मोह राहू नये. मनातल्या मनात देवाबरोबर असावं. त्याला मनाच्या मंदिरात साठवून ठेवावं. लोकात फार बडबड करू नये. त्या बडबडीनं वेळ मात्र जातो. फार लोकात अडकूनही नये. त्यातूनही वेळ सत्कारणी लागत नाही. बुद्धी आपल्या हाती असते. ती सावध ठेवावी. जागरुक असावं. बुद्धी गहाण टाकू नये. इंद्रियांना लगाम राखावा. त्यावर नियंत्रण ठेवावं. **''तुका म्हणे घडी घडीनं साधावी।''** एकेक क्षण देवाच्या चरणी अर्पावा. कसा? तर, सत्व - रज - तम या तीन गुणांची गुंतागुंत वाढू न देता त्यांची अलगद सोडवणूक करीत असावं. आणि जीवनातील क्षण न् क्षण सार्थकी लावावा. वेळेचा सदुपयोग करावा. त्यानंही जीवनात नित्य प्रसन्नता येते.

०००

# अभिप्राय



## रामनवमीचे शब्ददर्शन सुरेख

श्री साईलीलेचा नवीन (मे-जून ९७) अंक पोचला. अंक सुंदर निघाला आहे. लेख वाचताना संपादन कौशल्य लक्षात येते. रामनवमी सोहळ्याचे आपले इतिवृत्त शब्ददर्शन सुरेखच आहे.

**- डॉ. ग. वा. तगारे,**
सांगली.

## अंक खूप आवडला

आपल्या सव्यसाची संपादकत्वाखाली प्रसिद्ध झालेला 'श्री साईलीला' हा अंक मला माझे विद्वान स्नेही डॉ. नरेंद्र कुंटे यांचेकडून मिळाला. अंक खूपच आवडला. सुंदर मुखपृष्ठ, वैचारिक लेख, भक्तीरचना, अध्यात्माशी सुसंग विषय, ज्ञानी व अधिकारी व प्रथितयश लेखकांची मांदियाळी ही सर्व ठळक वैशिष्टचे अंकात एकसमयावच्छेदे आढळली म्हणून आनंद झाला. तो या पत्राने व्यक्त केला आहे.

**- वसंत गोडबोले,**
पुणे.

## सर्व लेख सरस

श्री साईलीलाचा अंक नियमितपणे मिळतो. सत्प्रवृत्त करणारा आपला अंक नेहमीच उपयुक्त व वाचनीय वाटत आला आहे. सर्व संतांची माहिती अंकाद्वारे दिल्याने सामाजिक सद्भावना उत्तम प्रकारे जोपासली गेली. एकंदर सर्वच लेख सरस आहेत.

**- ॲडव्होकेट अरुण गोडबोले,**
सातारा.

# साईबाबांचे गीता प्रवचन

— ❖ ❖ ❖ —

श्री साईबाबा हे ईश्वराचे प्रत्यक्ष युगावतारच होते त्यांच्या अनंत-अगम्य लिला पाहून अनेकांनी त्यांना कृष्णावतार मानून त्यांची भक्ती आराधना केलेली आहे.

बाबासारिख्या अवतारमूर्ती ।
परापकारार्थ जगी अवतारी ॥

असे हेमाडपंतानीही बाबांना अवतार म्हटलेले आहे. साईबाबा प्रवचन-कीर्तन-कथा करीत नसत पण त्यांचे ज्ञान अगाध होते. अनंत होते. ते बहुभाषिक होते, कारण ते सर्वव्यापी ईश्वराचे अवतारच होते.

गीतेतील एका श्लोकावर बाबांच्या प्रत्यक्ष मुखातून प्रवचन ऐकण्याचे महान भाग्य साईभक्त चांदोरकर यांना लाभले होते. त्या प्रसंगाचे हेमांडपतांनी 'श्रीसाईसच्चरित' पोथीच्या ३९ व्या अध्यायात सुंदर शब्दचित्र रेखाटलेले आहे. आपण त्या ओव्यांद्वारे बाबांचे गीता प्रवचन समजून घेऊन पावन होऊ या.

❖ ❖ ❖ —

तरी आतां श्रोतयां प्रार्थना ।
दूर सारूनियां व्यधान ।
शांत चिँहे द्या अवधान ।
होईल मना आनंद ॥
एकदा चांदोरकर सद्भक्त ।
बैसुनिया मशिदींत ।
असतां चरणसंवाहन करीत ।
गीताही गुणगुणत मुखाने ॥
भगवद्गीता चतुर्थाध्याय ।
जिव्हेसे लावूनि दिधला व्यवसाय ।
हस्तें चेपीत साईचे पाय ।
पहा नवल काय वर्तले ॥
भूत-भविष्य-वर्तमान ।
साईसमर्था सर्व ज्ञान ।
नानांस गीतार्थ समजावून ।
द्यावा हें मन जाहलें ॥
ज्ञानकर्म-संन्यासन ।
ब्रह्मार्पणयोगाध्यायाचें पठाण ।
नानांची ती अस्पष्ट गुणगुण ।
केली की कारण प्रश्नासी ॥
सर्व कर्माखिलं पार्थ ।
होय ज्ञानी परिसमाप्त ।
संपतां हा त्रयस्त्रिंशत ।
तेद्विद्धि प्रणिपात चालला ॥
हा जो श्लोक चवतिसावा ।
येथेच पाठास आला विसावा ।
बाबांच्या चित्तीं प्रश्न पुसावा ।
निजबोध ठसावा नानांस ॥
म्हणती नाना काय गुणगुणसी ।
म्हण रे स्पष्ट हळू जें म्हणसी ।
वेऊंदे की ऐकू मजसी ।
पुटपुटसी जें गालांत ॥
म्हण म्हणतां आज्ञा प्रमाण ।
श्लोक म्हटला चारी चरण।

बाबा पुसती अर्थनिवेदन । स्पष्टीकरणपूर्वक ॥
तंव ते नाना अतिविनीत । बद्धांजुली होऊनि मुदित ।
मधुर वचनें प्रत्युत्तर देत । वदत भगवंत मनोगत ॥
आतां हा साई नानासंवाद । व्हावया सर्वत्रांना विशद ।
मूळ श्लोक पदप्रपद । करूं कीं उद्धृत गीतेंतूनी ॥
कळावया प्रश्नाचे वर्म । तैसेच संतांचे मनोधर्म ।
करावा वाटे ऐस उपक्रम । जेणें ये निर्भ्रम अर्थ हाता ॥
आधीं गीर्वाण भाषा दुर्गम । साईंस कैसी झाली सुगम ।
आश्चर्य करिती प्रश्न सधर्म । ज्ञान हें अगम्य संतांचें ॥
कधीं अध्ययन केलें संस्कृता ।
कधीं नकळे वाचिली गीता ।
कीं तो गीतार्थहृद्रतज्ञाता । तैसा हो करिता प्रश्नातें ॥
श्रोतयांचिया समाधाना । व्हावी मूळ श्लोकाची कल्पना।
म्हणोनि अक्षरश: भगवंतरचना ।
वदतों जें विविचना साहयभूत ॥
''तेद्विद्धि प्रणिपातेन, परिप्रश्नेने सेवया ।
उपदेक्ष्यांति ते ज्ञानं, ज्ञानिनस्तत्त्वदर्शिन: ॥''
हा तो गीतेचा मूळश्लोक । भाषानुसार अर्थ देख ।
टीकाकारही झाले अनेक । ते एक वाक्यात्मक समस्त ॥
नानाही मोठे बहुश्रुत । गीताभाष्यपारंगत ।
कथूं लागती पदपदार्थ । यथाविदित श्लोकार्थ ॥
रसपूरित मधुरवाणी । नाना सविनय नम्रपणीं ।
अन्वयअर्थ आणूनि ध्यानीं । अर्थनिवेदनीं सादर ॥
म्हणती गुरूपदीं प्रणिपात । गुरूसेवेसी विकी जो जीवित ।
प्रश्नादिकीं आदरवंत । ज्ञानी त्या ज्ञानार्थ उपदेशिती ॥
सारांश कृष्णा कृपामूर्ति । अर्जुना जें प्रेमें वदती ।
गुरूसेवा गुरूप्रणती । ज्ञानसंवित्तिदायक ही ॥
अर्जुना एणें मार्गे जातां । तत्त्वदर्शी ज्ञानी तुजकरिता ।
दावितील ज्ञानाचा रस्ता । बाबा या अर्थी मी जाणें ॥
शांकरभाष्य आनंदगिरी । शंकरानंदी व्याख्या श्रीधरी ।
मधुसूदन नीलकंठाधारीं । उपदेशपरी ही देवाची ॥
प्रथम दोन चरणांचा अर्थ । मान्य करिती साई समर्थ ।
परी उत्तर श्लोकार्धमथित । साई जें कथित तें परिसा ॥
इतरही भक्तचकोरगण । साईमुखचंद्र अनुलक्षून ।
करावया अमृतकणसेवन । आ पसरूनि आस्थित ॥
म्हणती नाना तृतीय चरण । चुनश्च लक्षांत घेई पूर्ण ।
ज्ञान शब्दामागील जाण । अवग्रह आण अर्थास ॥

हें मी काय वदें विपरीत । अर्थाचा काय करितों अनर्थ ।
असत्य काय पूर्वील भाष्यार्थ । ऐसेंही निरर्थ ना मानीं ॥
ज्ञानी आणि तत्त्वदर्शी । ज्ञान उपदेशिती ऐसें जें म्हणसी ।
तेथें अज्ञान पद जैं घेसी । यथार्थ घेसील प्रबोध ॥
ज्ञान नव्हे बोलाचा विषय । कैसें होईल तें उपदेश्य ।
म्हणोनि ज्ञान शब्दाचा विपर्यय ।
करीं मग प्रत्यय अनुभवीं ॥
परिसिला तुझा ज्ञान-पदार्थ ।
अज्ञान घेतां काय रे वेंचत ।
अज्ञान वाणीचा विषय होत । ज्ञान हें शब्दातीत स्वयें ॥
वार वेष्टी गर्भासी । अथवा मल आदर्शासी ।
विभूति आच्छादी वन्हीसी । तैसेंच ज्ञानासी अज्ञान ॥
अज्ञानानें आवृत ज्ञान । केलें याय गीतीं भगवंतें कथन ।
एतदर्थ होतां अज्ञाननिरसन । स्वभावें ज्ञान प्रकाशे ॥
ज्ञान हें तों स्वत:सिद्ध । शैवालावृत तोयसें शुद्ध ।
हें शैवाल जो सारील प्रबुद्ध । तो जल विशुद्ध लाधेल ॥
जैसें चंद्रसूर्यांचें ग्रहण । ते तों सर्वदा प्रकाशमान ।
राहू केतु आड येऊन । आमुचे नयन अवरोधिती ॥
चंद्रसूर्यां नाहीं बाध । हा तों आमुचे दृष्टीस अवरोध ।
तैसें ज्ञान असे निर्बाध । स्वयंसिद्ध स्वस्थानीं ॥
डोळा करी अवलोकन । तयाची देखणी शक्ति तें ज्ञान।
वरी पडळ वाढे तें अज्ञान । तयाचें निरसन आवश्यक ॥
तें पडळ अथवा सारा । हस्तकौशल्यें दूर सारा ।
देखणी शक्ति प्रकट करा । अज्ञानतिमिरा झाडोनी ॥
पहा हें सकल दृश्यजात । अनिर्वचनीय मायाविजृंभित ।
हीच अनादि अविद्या अव्यक्त । अज्ञानविलसित तें हेंच ॥
ज्ञान ही वस्तु जाणावयाची । नव्हे ती विषय उपदेशाची ।
प्रणिपात परिप्रश्न सेवा हीचि । गुरूकृपेचीं साधनें ॥
विश्वाचें सत्यत्व महाभ्रम । हेंचि ज्ञानावरण तम ।
निरसूनि जावें लागे प्रथम । प्रज्ञान ब्रम्हा प्रकटे तैं ॥
संसारबीज जें अज्ञान । डोळां पडतां गुरूकृपांजन ।
उडे मायेचें आवरण । उरे तें ज्ञान स्वाभाविक ॥
ज्ञान हें तों नव्हे साध्य । तें तों आधींच स्व्यंसिद्ध ।
हें तो आगमनिगमप्रसिद्ध । अज्ञान हा विरोध ज्ञानाला ॥
देवां भक्तां जें भिन्नपण । हेंच मूळ अज्ञान विलक्षण ।
तया अज्ञानाचें निरसन । होतांच पूर्ण ज्ञान उरे ॥
दोरापोटीं सर्पा जनन । हें तों शुद्धस्वरूपाज्ञान ।

स्वरूपोपदेशें निरसे अज्ञान । उरे तें ज्ञान दोराचें ॥
पोटीं सुवर्ण वरी काट । काटापायेटीं लखलखाट ।
परी तो व्हावयालागीं प्रकट । हव्यवाटचि आवश्यक ॥
मायामूळ देहजनन । अदृष्टाधीन देहाचें चलन ।
द्वंद्वें सर्व अदृष्टाधीन । देहाभिमान अज्ञान ॥
म्हणोनि जे स्वयें निरभिमान । तयां न सुखदुःखाचें भान ।
विरे जें अहंकाराचें स्फुरण । तैंच अज्ञाननिरास ॥
स्वस्वरूपाचें अज्ञान । कतेंच मायेचें जन्मस्थान ।
होतां गुरूकृपा मायानिरसन ।स्वरूपज्ञान स्वभावें ॥
एका भगवन्दक्तिवीण । किमर्थ इतर साधनीं शीण ।
ब्रम्हादेवही मायेअधीन । भक्तीच सोडवण तयाही ॥
हो कां ब्रम्हासदनाप्राप्ति । भक्कतीवांचूनि नाहीं मुक्ति ।
तेथेंही चुकल्या भगवदक्ति । पडे तो पूनरावृत्तींत ॥
तरी व्हावया मायानिरसन । उपाय एक भगवदजन ।
भगवदक्ता नाहीं पतन । भवबंधनही नाहीं तया ॥
जन म्हणती माया लटकी । परी ती आहे महाचेटकी ।
ज्ञानियां फसवी घटकोघटकीं । भक्त नाचविती
चुटकीवरी ॥
जेथें ठकती ज्ञानसंपन्न । तेथें टिकती भाविकजन ।
कीं ते नित्य हरिचरणीं प्रपन्न । ज्ञानाभिमानधन ज्ञानी ॥
म्हणोनि व्हावया मायातरण । धरावे एक सधुरूचरण।
रिघावें तया अनन्य शरण । भवभयहरण तात्काळ ॥
अवश्य येणार येवो मरण । परी न हरीचें पडो विस्मरण ।
इंद्रियीं आश्रमवर्णाचरण । चित्तें हरिचरण चिंतावे ॥
रथ जैसा जुंपल्या हयीं । तैसेंच हें शरीर इंद्रियीं ।
मनाच्या दृढ प्रगृहीं । बुद्धि निग्रही निजहस्तें ॥
मन संकल्पविकल्प भरीं । धांवे यथेष्ट स्वेच्छा विहारी ।
बुद्धि त्या निजनिश्चयें निवारी । लगाम आवरी निजसत्ता ॥
बुद्धीसारिखा कुशल नेता । ऐसा सारथी रथीं असतां ।
रथस्वामींसी काय चिंता । स्वस्थ चित्ता व्यवहरे ॥
देहगत सकल कार्य । हें बुद्धीचें निजकर्तव्य ।
ऐसी मनासी लागतां संवय । सर्व व्यवसाय हितमय ॥
शब्दस्पर्शरूपादि विषय । येणें मार्गे लागल्या इंद्रिय ।
होईल व्यर्थ शक्तिक्षय । पतनभय पदोपदीं ॥
शब्दस्पर्शरूपादिक । पंचविषयीं जें जें सुख ।
तें तें अंतीं सकळ असुख । परम दुःख अज्ञान ॥
शब्दविषया भुले हरिण । अंतीं वेंची आपुला प्राण ।
स्पर्शविषया सेवी वारण । साहे आकर्षण अंकुशें ॥
रूपविषया भुले पतंग । जाळूनि निमे आपुलें अंग ।
मीन भोगी रसविषयभोग । मुके सवेग प्राणास ॥
गंधालागीं होऊनि गुंग । कमलकोशीं पडे भृंग ।
एकेका पायीं इतुका प्रसंग । पांचांचा संघ भयंकर ॥
हीं तों स्थावर जलचर पंखी ।
ययांची दुःस्थिती देखोदेखी ।
ज्ञाते मानवही विषयोन्मुखी ।
अज्ञान आणखी ते काय ॥
अज्ञाननाशें विषयविमुख। होतां, होईल उन्मनीं हरिख ।
जीव ज्ञानस्वरूपोन्मुख । आत्यंतिक सुख लाधेल ॥
चित्तें करा हरिगुरूचिंतन । श्रवणें करा चरित्रश्रवण ।
मनें करा ध्यानानुसंधान । नामस्मरण जिव्हेनें ॥
चरणीं हरिगुरूग्रामा गमन । घ्राणीं तन्निर्माल्याघ्राणन ।
हस्तीं वदा तयाचे चरण । डोळां घ्या दर्शन तयांचे ॥
ऐशा या सकल इंद्रियवृत्ति । तयांकारणें लाविता प्रीति ।
धन्य तयाय भक्तांची स्थिति । भगवदक्ति काय दुजी ॥
सारांश समूळ अज्ञान खाणा । उरे तें ज्ञान सिद्ध जाणा ।
ऐसें या श्लोकाचें हृदत अर्जुना । श्रीकृष्णाराणा सूचवी ॥
आधींच नाना विनयसंपन्न । परिसूनि गोड हें निरूपण ।
पायीं घालूनि लोटांगण । वंदिले चरण दों हातीं ॥
मग ते श्रद्धानिष्ठ प्रार्थना । करिती दवडा मम आज्ञाना ।
दंड माझिया दुरभिमाना । यथार्थ शासना करोनि ॥
सात्त्विकतेची हौस वरिवरी । विकल्प अखंड दाटे अंतरी ।
अपमान साहेना क्षणभरी । अज्ञान तें तरी काय दुजें ॥
पोटीं प्रतिष्ठेची उजरी । ध्यानाविर्भाव दावी वरी ।
कामक्रोध धुमसे भीतरीं । अज्ञान तें तरी काय दुजें ॥
आंतूनि सकळ कर्मे नष्ट । बाहेर मिरवूं ब्रम्हनिष्ठ ।
आचारहीन विचारभ्रष्ट । अज्ञान स्पष्ट काय दुजें ॥
बाबा आपण कृपाधन । करोनियां कृपाजलसिंचन ।
करा हा अज्ञानदावानल शमन । होईन मी धन्य इतुकेनी ॥
नलगे मज ज्ञानाची गोठी । निरसा माझिया अज्ञानकोटी।
ठेवा मजवरी कृपादृष्टी । सुखसंतुष्टी तेचि मज ॥
साई सप्रेम करूणाधन । नानांस निमित्ता पुढें करून ।
तुम्हां आम्हां सकलांलागून । गीतार्थप्रवचन हें केलें ॥
गीता भगवंताचें वचन । म्हणोनि हें प्रत्यक्ष शास्त्र जाण ।
कालत्रयींही याचें प्रमाण । कधींही अवगणन होतां नये ॥

(अध्याय ३९ ओवी क्र. २९ ते १०७)

**ग्रंथ परिचय**

# धर्मदर्शन : एक दीपस्तंभ



**अ**हमदनगर येथील वेदांतनगर व दत्तमंदिर बहुतेकांना आता चांगलेच परिचित झालेले आहे. तेथे निवास करणारे दत्तयोगी श्रीरामकृष्ण क्षीरसागर महाराज हे अनेकांचे परमश्रद्धास्थान आहे. त्यांना गुरूस्थानी मानणारी मंडळीही खूप मोठ्या संख्येने आहे. क्षीरसागर महाराज यांना श्रीनृसिंह सरस्वती यांची गुरूकृपा लाभली असून अखंड ध्यान-धारणा ,ईशसेवा व भगवद्‌चिंतनामुळे क्षीरसागर महाराज सिद्धावस्थेस पोचलेले आहेत.

क्षीरसागर महाराज यांच्या **धर्मसंवादांनी** अनेकांना सन्मार्गाचे सदाचाराचे धडे मिळाले असून महाराजांचा **धर्मसंवाद** अनेकांना प्रेरणादायी व फलदायी ठरलेला आहे. वेदांतनगर मधून प्रकाशित होणाऱ्या 'गुरूवाणी' व 'अमृतकलश आणि **'श्रीगुरूसेवा'** या नियनकालिकातून महाराजांच्या धर्मसंवादाचा अक्षर लाभ त्यांच्या भक्तांना गेली अनेक वर्षे होत आला आहे. या नियतकालिकात वेळोवेळी प्रकाशित झालेल्या महाराजांच्या विविध विचारातील धर्म विषयक विचारांचे वर्गीकरण व एकत्रित स्वरूपामध्ये प्रकाशन नुकत्याच प्रकाशित झालेल्या **'धर्मदर्शन'** या ग्रंथाद्वारे श्रद्धावंत वाचकांसाठी उपलब्ध झालेले आहे. धार्मिक साहित्य वाचनाची आवड असणाऱ्यांना हे **'धर्मदर्शन'** ही एक पर्वणीच आहे.

या छोटेखानी ग्रंथामध्ये **'धर्मसंस्थापना,' 'धर्मविचार,' 'धर्मसाधना'** आणि **'मुक्ती वरीलभक्ती'** अशा चार विभागात क्षीरसागर महाराजांचे विचार संग्रहीत करण्यात आलेले आहेत. महाराजांचे विचार म्हणजे त्यांच्या **धर्मचिंतनाचे नवनीत** आहे.

वैदिक धर्माविषयीचे रूढ गैरसमज व अपसमजुती दूर करण्याचे यशस्वी कार्य या ग्रंथाद्वारे होत असून महाराजांचे सर्वच विचार चिंतानात्मक आहेत. परमार्थासाठी प्रपंच सोडण्याची गरज नाही उलट प्रपंच व परमार्थ ही जीवनाची दोन चाके आहेत. प्रपंच हा परमार्थास मारक नसून पूरक आहे असे विचार ज्ञानदेव-तुकाराम आदी संतांनी आपल्या अभंगातून व्यक्त केलेले आहेत. क्षीरसागर महाराजांनी सुद्धा तोच विचार मांडलेला आहे,

**'जयाचे ऐहिक धड नाही। तयासी परत्र पुसशी कांही'** असे ज्ञानदेवांनी म्हटले असून परत्र म्हणजे परमार्था एवढेच ऐहिक संसार घडपणे उत्तमपणे करण्यावर त्यांनी भर दिलेला आहे. ज्ञानदेवांचा हा विचार संत एकनाथांनी स्वत:च्या आचरणाने सर्वांपुढे ठेवलेला आहे.

आजच्या सांप्रत कलियुगी आचार-विचार व व्यवहारामध्ये नीतीचा फार ऱ्हास झालेला आहे कधी नव्हे एवढे भारतीय समाजात पाश्चिमात्यांच्या अंधानुकरणाचे आकर्षण वाढलेले आहे. सारा समाज आत्मविस्मृती होऊन पाश्चात्यजगाच्या उपभोग हेच जीवन या वाटेने रसानळाला चाललेला आहे. अशा काळात खऱ्या धर्माची खऱ्या श्रेयसची सर्व समाजास पुन्हा एकदा ओळख होऊन आत्मभान प्राप्त होण्याची गरज आहे. ही गरज भागविण्यास क्षीरसागर महाराज यांचे 'धर्मदर्शन' हे पुस्तक एखाद्या दीपस्तंभासारखे मार्गदर्शक ठरणारे आहे.

**जेथे जातो तेथे तू माझा सांगाति।**
**चालविसी हाती धरोनिया ॥**

या अभंगरचा प्रमाणे क्षीरसागर महाराजाचा **'धर्मसंवाद'** आपणास हाताला धरून नि:श्रेयसच्या मार्गावर नेण्याचे कार्य करतो. प्रत्येक गृहस्थाने हे पुस्तक आपल्या घरी संग्रहात ठेवून,आपल्या पाल्यांपुढे रोज एक एक विचार वाचून दाखविला पाहिजे व नव्या पिढीला पाश्चात्याच्या अंधानुकरणापासून रोखण्या बरोबरच स्वसंस्कृतीची खरी ओळख करून दिली पाहिजे.

**विद्यानंद**

**धर्मदर्शन**
(क्षीरसागर महाराजांची अमृतवाणी)
पाने १३१ मूल्य ४० रु.
दत्त देवस्थान ट्रस्ट, अहमदनगर.

OOO

# विदेशी चिंतकांची प्रचिती

धर्माच्या क्षेत्रात इतर सर्व देश दरिद्र आहेत, पण भारत देश ह्या बाबतीत करोडोपती आहे.

*– मार्क ट्वेन (अमेरिका)*

ह्या पृथ्वीवर सर्वाधिक पूर्ण विकसित मानवप्रज्ञा कोठे आहे आणि जीवनाच्या महत्वाच्या प्रश्नांची सोडवणूक कोणी शोधली असे जर मला विचारले गेले तर मी अंगुलीनिर्देश करून सांगेन की भारतानेच!

*– मॅक्स मूलर (जर्मनी)*

वेदांतासारखा उर्ध्वगामी आणि उन्नतीकारक दुसरा एकही धर्म किंवा दुसरे एकही तत्वज्ञान नाहीच.

*– शोपनहोअर (जर्मनी)*

विश्वात केवळ भारतच अशी श्रेष्ठ महान परंपरा राखून आहे की, जी परंपरा कित्येक वर्षांपासून जिवंत राहिली आहे.

*– केनो (फ्रान्स)*

मानव जातीच्या अस्तित्वाच्या सर्वात सुरवातीच्या दिवसांपासून आजपर्यंत जिवंत मनुष्याची सर्व स्वप्ने जर कुठे साकार झाली असतील तर ते स्थान आहे 'भारत'.

*– रोमा रोला (फ्रान्स)*

भारत देश संपूर्ण मनुष्य जातीची मातृभूमी आहे आणि संस्कृत, युरोपच्या सर्व भाषांची जननी आहे. भारत आमच्या तत्वज्ञान, गणितशास्त्र आणि जनतंत्राची जननी आहे. भारतमाता अनेक रूपाने सर्वांची जननी आहे.

*– विल डुरान्ट (अमेरिका)*

बायबलचा मी यथार्थ अभ्यास केला आहे. त्यात जो दिव्य लेख आहे तो केवळ गीताच्या उद्धरणाच्या रुपात आहे. मी ख्रिश्चन असूनसुद्धा गीतेबद्दल इतका सारा आदरभाव यासाठी आहे की, ज्या गूढ प्रश्नांचे समाधान पाश्चात्य लोक अजूनपर्यंत करू शकले नाहीत त्याचे समाधान गीताग्रंथाने शुद्ध आणि सोप्या पद्धतीने केलेले आहे. त्यात कित्येक सूत्र, अलौकिक उपदेशांनी भरलेली आहेत म्हणून गीता माझ्यासाठी साक्षात योगेश्वरीमाता बनली आहे. ती तर विश्वातील सर्व धन एकत्र केले तरीही खरेदी केली जाऊ शकणार नाही असा भारत वर्षाचा तो एक अमूल्य खजिना आहे.

*– एफ. एच. मोलेम (इंग्लंड)*

प्राचीन युगाच्या सर्व रमणीय वस्तूंमध्ये गीतेपेक्षा श्रेष्ठ दर्जाची कोणतीच वस्तू नाही. गीतेत असे उत्तम आणि सर्वव्यापी ज्ञान आहे की त्याच्या रचनाकार देवाला अनेक वर्षे होऊन गेलीत, तरीसुद्धा अजून असा दुसरा एकही ग्रंथ लिहिला गेला नाही.

*– महात्मा थोरो (अमेरिका)*

# श्री साईबाबा संस्थान, शिरडी

## प्रकाशित पुस्तकांची यादी

| अनु. क्रमांक | पुस्तकाचे नाव | भाषा | किंमत | पॅकिंग व पोस्टेज |
|---|---|---|---|---|
| १. | श्री साई सत्चरित | मराठी | ४८.०० | १२.०० |
| २. | श्री साई सत्चरित | इंग्रजी | १८.५० | १०.०० |
| ३. | श्री साई सत्चरित | हिंदी | २४.०० | १०.०० |
| ४. | श्री साई सत्चरित | गुजराथी | २३.०० | १०.०० |
| ५. | श्री साई सत्चरित | कन्नड | २२.०० | १०.०० |
| ६. | श्री साई सत्चरित | तेलुगु | २७.०० | १०.०० |
| ७. | श्री साई सत्चरित | तामीळ | २७.०० | १०.०० |
| ८. | श्री साई सत्चरित | सिंधी | २२.०० | १०.०० |
| ९. | श्री साई सत्चरित पोथी | गुजराथी | ३१.०० | १२.०० |
| १०. | श्री साईलीलामृत | मराठी | ९.५० | १०.०० |
| ११. | श्री साईलीलामृत | हिंदी | १२.५० | १०.०० |
| १२. | श्री साईलीलामृत | गुजराथी | ६.६५ | ८.०० |
| १३. | अवतार व कार्य | मराठी | ६.८० | ८.०० |
| १४. | स्तवन मंजिरी | मराठी | १.०० | ८.०० |
| १५. | स्तवन मंजिरी | हिंदी | १.१५ | ८.०० |
| १६. | स्तवन मंजिरी | गुजराथी | १.३० | ८.०० |
| १७. | स्तवन मंजिरी | इंग्रजी | २.०० | ८.०० |
| १८. | सगुणोपासना (आरती) | मराठी | १.२५ | ८.०० |
| १९. | सगुणोपासना (आरती) | हिंदी | १.५० | ८.०० |
| २०. | सगुणोपासना (आरती) | गुजराथी | १.१० | ८.०० |
| २१. | सगुणोपासना (आरती) | तेलुगु | ४.६० | ८.०० |
| २२. | सगुणोपासना (आरती) | सिंधी | - | ८.०० |
| २३. | दासगणूकृत ४ अध्याय | मराठी | ३.०० | ८.०० |
| २४. | सचित्र साईबाबा | मराठी/इंग्रजी | - | ८.०० |
| २५. | मुलांचे साईबाबा | मराठी | २.०० | ८.०० |
| २६. | मुलांचे साईबाबा | इंग्रजी | २.६० | ८.०० |
| २७. | मुलांचे साईबाबा | हिंदी | २.०० | ८.०० |
| २८. | मुलांचे साईबाबा | गुजराथी | १.७५ | ८.०० |
| २९. | मुलांचे साईबाबा | तेलुगु | - | ८.०० |
| ३०. | रुद्राध्याय (अ. ११ वा) | मराठी | १.१५ | ८.०० |
| ३१. | साई दि सुपरमॅन | इंग्रजी | ६.७० | ८.०० |
| ३२. | साईबाबा ऑफ शिरडी (भरुचा) | इंग्रजी | - | ८.०० |
| ३३. | साईबाबा ऑफ शिरडी (प्रधान) | इंग्रजी | ३.५० | ८.०० |
| ३४. | रघुनाथ सावित्री भजनमाला | मराठी | - | १०.०० |
| ३५. | खापर्डे डायरी | इंग्रजी | ११.०० | १०.०० |

# साईभक्तांना आवाहन

प्रिय साईभक्तांनो !
सप्रेम नमस्कार,

आपण 'श्री साईलीला'चे वाचक आणि वर्गणीदार आहात. 'श्री साईलीला'चे नवे स्वरूप आपण सर्वांनाच आवडले आहे. आपणापैकी तशी पत्रे आम्हाला पाठविली आहेत. त्याबद्दल धन्यवाद !

श्री साईबाबांचे कार्य, त्यांची शिकवण, भक्तांना आलेले त्यांचे अनुभव आणि अध्यात्माचा प्रसार अधिकाधिक लोकांत करणे म्हणजेच साईसेवा आहे. त्यासाठी 'श्री साईलीला' सर्वाधिक लोकांपर्यंत पोहोचावयास हवा. या साईसेवेत आपण वाढ करू शकता !

आपण फक्त पाच वर्गणीदार 'श्री साईलीला'स मिळवून द्यायचे. यामुळे आपल्या हातूनही साईसेवा घडेल आणि श्री साईबाबा आपल्यावर कृपा करतील याची आपणासही कल्पना आहेच.

तरी खालील फॉर्मवर पाच वर्गणीदारांचे पत्ते व प्रत्येकी ५० रु. प्रमाणे एकूण २५० रु. पाठवावे.

कळावे. श्री साईबाबांच्या आशीर्वादासह !

आपला स्नेहांकीत,
**विद्याधर ताठे**
कार्यकारी संपादक
'श्री साईलीला'

-------- ✂ -------- इथे कापा -------- ✂ --------

कार्यकारी संपादक
'श्री साईलीला',
८०४-बी, साईनिकेतन,
डॉ. आंबेडकर रोड, दादर (पू.),
मुंबई - ४०० ०१४.

यांस,

आपण साईभक्तांना आवाहन केल्याप्रमाणे सोबतच्या जोडलेल्या कागदावर पाच वर्गणीदारांचे पत्ते पाठवीत असून त्यांची प्रत्येक ५० रु. प्रमाणे रु. २५० (एकूण दोनशेपन्नास मात्र) सोबत मनीऑर्डरने/चेकद्वारा/रोख पाठवीत आहे. त्याचा स्वीकार व्हावा.

श्री साईबाबांच्या शिकवणुकीचा प्रसार करण्याची संधी आपण यानिमित्ते मला देऊन साईसेवा करण्यास उद्युक्त केलेत याबद्दल आभारी आहे. कळावे.


आपला,

नाव : ______________________

पत्ता : ______________________

______________________

(ता.क.: सोबतच्या कागदावर पाच नव्या वर्गणीदारांचे पत्ते जोडले आहेत.)



# श्री साईबाबा संस्थान शिरडी

## विश्वस्त मंडळ


**श्री. द. म. सुकथनकर**
(अध्यक्ष)

श्री. मोहन मो. जयकर (सदस्य)
श्री. रमेश दा. सोनी ''
श्रीमती रेखा ग. दिघे ''
श्री. प्रकाश व. कारखानीस ''
श्री. मुकेश र. पटेल ''
श्री. मधुकर द. जोशी ''
श्री. प्रकाश पी. वैशंपायन ''
श्री. मधुकर ज. गर्दे पाटील ''
श्री. देवकीनंदन सारस्वत ''
श्री. आप्पासाहेब खं. कोते ''
श्री. रायभान ग. चिने (सदस्य)
श्री. भास्कर शं. बोरावके ''
श्री. अण्णासाहेब सा. म्हस्के पाटील ''
श्री. राजीव पुं. रोहोम ''
श्री. संभाजी कि. काळे ''
श्री. अशोक भि. खांबेकर ''
सौ. प्रेमाबाई सो. बज ''
श्री. रामचंद्र नि. गोसावी ''
श्री. प्रभाकर तु. बोरावके ''
श्री. सोपान मा. धोर्डे ''

Registered with the Registrar of News-Papers of India No. MH/627
श्री साईबाबा संस्थान शिरडीकी अधिकृत पत्रिका

# श्री साईलीला

अमृत महोत्सवी वर्ष
जुलै–ऑगस्ट १
(गुरुपौर्णिमा वि
संपादक : द. म. सुकथनकर
कार्यकारी संपादक : विद्याधर ताठे
मूल्य ८ रु.



श्री साईबाबा संस्थानने शिरडी येथील बाबांच्या समाधीभोवती रंगीत कलाकुसरीचे नक्षीकाम असलेला संगमरवर बसवून समाधी मनमोहक – प्रसन्न केले आहे. नक्षीकाम दर्शविणारी दोन छायाचित्रे.



श्री साईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत नियतकालिक सप्टेंबर-ऑक्टोबर १९९७ / रु

# श्री साईलीला

संपादक : द.म. सुकथनकर कार्यकारी संपादक : विद्या



## दसरा विशेषांक

# गुरुपौर्णिमा उत्सव - क्षणचित्रे



गुरुपौर्णिमा उत्सवातील पोथी, वीणा व बाबांच्या फोटोच्या मिरवणुकीतील एक दृश्य



मिरवणूक गुरुस्थानापाशी आली तेव्हाचे क्षणचित्र



द्वारकामाईतील 'श्रीसाईसच्चरित' अखंड पारायणाचा 'श्रीगणेशा'



ह.भ.प. डॉ. गणेशराव परांजपे यांच्या प्रबोधक कीर्तनाचे एक दृश्य

श्री साईबाबा संस्थान शिरडीचे अधिकृत नियतकालिक

# श्रीसाईलीला



## दसरा विशेषांक
(सप्टेंबर - ऑक्टोबर १९९७)

: संपादक :
द. म. सुकथनकर

: कार्यकारी संपादक :
विद्याधर ताठे

कार्यालय :
'साईनिकेतन', ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई - ४०० ०१४.
दूरध्वनी. : ४१६ ६५ ५६ ● फॅक्स : (०२२) ४१५ ०७९८

: मुद्रक :
गीता ऑफसेट, मुंबई.

: टाईपसेटींग :
देवयानी एन्टरप्रायझेस, मुंबई.

वार्षिक वर्गणी : रु. ५०/- ● आजीव सभासद वर्गणी : रु. १०००/-
परदेशाकरिता वार्षिक वर्गणी : रु. १०००/- (टपाल खर्चासहित)

मुद्रक, प्रकाशक द. म. सुकथनकर, अध्यक्ष श्री साईबाबा संस्थान शिरडी
यांनी हे नियकालिक, 'साईनिकेतन', ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई - १४ येथे छापून प्रसिद्ध केले.

या नियतकालिकातील लेखात प्रसिद्ध झालेली मते ही त्या लेखातील लेखकांची स्वतंत्र मते असून त्या मताशी संपादक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.



# श्री साईबाबा संस्थान शिरडी

## विश्वस्त मंडळ

श्री. द. म. सुकथनकर
(अध्यक्ष)

| | | | |
|---|---|---|---|
| श्री. मोहन मो. जयकर | (सदस्य) | श्री. रायभान ग. चिने | (सदस्य) |
| श्री. रमेश दा. सोनी | (सदस्य) | श्री. भास्कर शं. बोरावके | (सदस्य) |
| श्रीमती रेखा ग. दिघे | (सदस्य) | श्री. अण्णासाहेब सा, म्हस्के पाटील | (सदस्य) |
| श्री. प्रकाश व. कारखानीस | (सदस्य) | श्री. राजीव पुं. रोहोम | (सदस्य) |
| श्री. मुकेश र. पटेल | (सदस्य) | श्री. संभाजी कि. काळे | (सदस्य) |
| श्री. मधुकर द. जोशी | (सदस्य) | श्री. अशोक भि. खांबेकर | (सदस्य) |
| श्री. प्रकाश पी. वैशंपायन | (सदस्य) | सौ. प्रेमाबाई सो. बज | (सदस्य) |
| श्री. देवकीनंदन सारस्वत | (सदस्य) | श्री. प्रभाकर तु. बोरावके | (सदस्य) |
| श्री. आप्पासाहेब खं. कोते | (सदस्य) | श्री. सोपान मा. धोर्डे | (सदस्य) |

# अंतरंग


- संपादकीय : विद्याधर ताठे — ४
- विश्वस्त मंडळ : कार्य आढावा — ७
- अमृतकलश : सगुणोपासना पोथीची जन्मकथा — ११
- श्री साईबाबाच्या देहत्यागाचा परम अर्थ : प्राचार्य कुलकर्णी — १३
- तोचि दिवाळी दसरा : हरिश्चंद्र म्हात्रे — १८
- श्री साई अवतार व कार्य : विद्याधर ताठे — २३
- शांतिक्षेत्र शिरडी : शाम जुवळे — २६

- बोधकथा : ह. ल. रानडे — २७
- नवविधाभक्ती : कृष्णा तेली — ३०
- अन्नपूर्णास्तोत्र : कै. स. कृ. देवधर — ३३


- साईभक्तांचे अनुभव : (संकलन) — ३५
- पाही कृपादृष्टी साई : गोविंद कोठावडे — ४३

- झालो आता पोरके । ज्ञानविण ॥ : चेतन — ४६
- संत कबीर : डॉ. तांदळे — ४७
- राजयोगी श्रीमाणिकप्रभू : गजानन कुळकर्णी — ४८
- श्रद्धा आणि सबुरीचे फळ : म. पां. वाळिंबे — ५२
- जगाच्या कल्याणा : सौ. जगतकर — ५५
- दैवी संपदा : प्रणव — ५७

- साई वंदना (साईपर गीते, कविता, अभंग, संकलन) — ५९
- ग्रंथ परिचय : साईचरणकण — ६४
- जीवनसाधना : डॉ. ग. प्र. परांजपे — ६५

- संस्थान प्रकाशित पुस्तकांची सूची — ६७
- आवाहन — ६८



# संपादकीय

**विद्याधर ताठे**



**वसे जो सदा दावया संतलीला।**
**दिसे अज्ञ लोकांपरी जो जनाला।**
**परी अंतरी ज्ञान कैवल्यदाता।**
**नमस्कार साष्टांग श्रीसाईनाथ॥**

श्री साईलीलाचा प्रस्तुतचा, श्री साईबाबा पुण्यतिथीच्या मुहूर्तावर प्रकाशित होत असलेला **'दसरा विशेषांक'** साईभक्त वाचकांच्या हाती देताना कार्यकारी संपादक या नात्याने मला कर्तव्यपूर्तीचा-सेवासाफल्याचा असीम आनंद होत आहे. गेली दोन वर्षे ही सेवा करण्याचे परमभाग्य मला लाभले असून ही दयाघन श्री साईचीच कृपा आहे. दोन वर्षांपूर्वीची **'श्रीसाईलीला'** ची स्थिती अत्यंत अनियमित होती. बरेच अंक प्रकाशित झालेले नव्हते. पण साईकृपेच्या प्रतापाने माझ्या हातून गेल्या दोन वर्षातील सर्वच्या सर्व अंक, मागील प्रलंबित अंकासह ठरलेल्या वेळेवर-नियमितपणे प्रकाशित झालेले आहेत. या सेवासाफल्याच्या क्षणी, हेमाडपंत विरचित 'साईसच्चरित' पोथीतील पुढील ओवी माझ्या डोळ्यापुढे येते व साईकृपेच्या प्रचितीने डोळे भरून येतात.

**भक्त जी जी सेवा कल्पिती।**
**संत स्वयेंचि करवूनि घेती।**
**भक्त केवळ कारण निमित्ती।**
**सकळ स्फूर्ती संतांची॥ (२: १९)**

दसरा हा सण, बाबांचा **'पुण्यतिथी दिन'** म्हणून साईभक्तांचा परम पावन दिन आहे. इ. स. १८१८ साली श्री साईबाबांनी आपला नश्वर देह पंचभूतात विलीन केला, आज त्या घटनेस ६९ वर्षे झाली तरी पण बाबांचा महिमा अखंड दुमदुमत आहे. साईबाबांची प्रचिती आजही भक्तांना येत आहे. साईबाबांच्या दिगंत महिम्याने जात-वर्ण-भाषा-प्रांत एवढेच नव्हे तर देशाच्या सीमाही पार केल्या असून देशोदेशी साईभक्तीचा मळा फुलू लागला आहे. देशाच्या सीमा पार करून सर्व मानवजातीला आपल्या भक्ती कवेत घेणारा **'श्रीसाई'** हा महाराष्ट्रातील नव्हे तर भारतातील पहिला अवतारी पुरुष आहे. इंग्लंड, अमेरिका, नेपाळ मधील साई मंदिरे व साईभक्त या गोष्टीची ढळढळीत साक्ष आहे. शिर्डीला मुंग्यासारखी भक्तांची रांग लागेल असे श्रीसाईबाबा म्हणत असत त्याची आपणास आज प्रचिती येते व बाबांच्या द्रष्टेपणाला शतशः नमन करण्यासाठी आपण नकळत खाली झुकतो. आणि 'दिव्यत्वाची येथ प्रचिती' म्हणत भक्त बाबांच्या भक्तीत हरवून धन्य धन्य होतो.

श्री साईलीला नियतकालिकाचे चालू वर्ष हे अमृतमहोत्सवी वर्ष आहे हे सर्व साईभक्त वाचकांना विदीत आहेच. त्यानिमित्ताने गेल्या ७४ वर्षात प्रकाशित झालेल्या विशेष लेखांचे श्रीसाईलीलामधून **'अमृतकलश'** या मथळ्याखाली प्रकाशन करण्याचा प्रकल्प आम्ही हाती घेतला आहे. प्रस्तुत अंकात **'श्रीसाईगुणोपासना'** या पोथीची जन्मकथा

# संपादकीय

विद्याधर ताठे




१९२३ च्या श्रीसाईलीलातून घेऊन आम्ही पुनर्प्रसिद्ध केलेली आहे. साई परम भक्त कृष्णशास्त्री भीष्म यांच्या साईभक्तीतून या पोथीचा जन्म झाला असून ही कथा साईभक्तांचा दसरा दिवाळीचा आनंद शतगुणीत करेल असा आम्हाला विश्वास वाटतो.

श्री साईबाबा संस्थानच्या, श्री. द. म. सुकथनकर यांच्या अध्यक्षतेखाली विश्वस्त मंडळास गेल्या महिन्यात (सप्टेंबर) तीन वर्षे पूर्ण झाली आहेत. गेली दोन वर्षे दसरा विशेषांकात आम्ही या विश्वस्त मंडळाच्या कार्याचा आढावा साई भक्तांना सविनय सादर केलेला आहे. प्रस्तुत अंकातही विश्वस्त मंडळाच्या गेल्या वर्षभरातील कार्याचा आढावा आम्ही दिलेला आहे. साईभक्तांनी त्याची नोंद घ्यावी. साईभक्तांना केंद्रस्थानी मानून साईभक्तांच्या सोयींना प्राधान्य हे तत्त्व डोळ्यापुढे ठेवून विश्वस्त मंडळाने आपले सर्व निर्णय केलेले आहेत.

साई अनुभव, साईप्रचिती या मथळ्या खाली साईभक्तांना आलेले बाबांचे विविध अनुभव आम्ही प्रत्येक अंकात प्राधान्याने प्रकाशित केलेल आहेत. भाबडेपणा-अंधश्रद्धा यांना खतपाणी घातले जाईल असे अनुभव टाळून, विज्ञानयुगाचे भान ठेवून आम्ही अनुभवांची निवड केलेली आहे. अनुभवांचा तोच तोचपणा अंकाच्या वाचनियतेला मारक ठरतो. 'श्री साईलीला' वाचनीय-संग्राह्य व्हावा अशी प्रत्येक साईभक्ताची इच्छा असते व आमच्याकडे आजवर आलेल्या पत्रावरून, अभिप्रायावरून साईभक्तांच्या इच्छेची आमच्याकडून पूर्ती होत आहे असे वाटते अर्थात ही साईचीच कृपा. अंकातील उणीवा-त्रूटी यांचीही आम्हास जाणीव असून त्याबद्दल आम्ही मनःपूत दिलगिरी व्यक्त करतो. यापुढे या त्रुटी कमीत कमी राहण्यासाठी आम्ही अधिकाधिक प्रयत्न करू. तुम्ही 'श्री साईलीला'स अधिकाधिक वर्गणीदार मिळवून देण्याचे प्रयत्न करावेत.

**यंदाची दसरा-दिवाळी सर्व साईभक्त वाचकांना सुखसमृद्धीची, निरामय आनंदाची व भरभराटीची जावो ही हार्दीक शुभेच्छा !**

**अविवेकाची काजळी। फेडूनि विवेक दीप उजळी।**
**योगीया पाहे दिवाळी। निरंतर ॥**



**विद्याधर ताठे**
*कार्यकारी संपादक*

# देव्याष्टक-स्तोत्र



महादेवी, महाशक्ति, भवानी, भव-वल्लभाम् ।
भवार्ति, भंजन-करीं, वन्दे त्वां लोक-मातरम् ॥१॥

भक्ति-प्रियां, मुक्ति-गम्यां, भक्तांनां, कीर्ति-वर्धिकाम् ।
भव-प्रियां, सतीं-देवीं, वन्दे त्वां भक्त-वत्सलाम् ॥२॥

अन्नपूर्णा, सदापूर्णा, पार्वती-पव-पूजताम् ।
माहेश्वरी, वृषा-रूढां, वन्दे त्वां परमेश्वरीम् ॥३॥

काल-रात्रिं, महा-रात्रिं, मोह-रात्रिं, जनेश्वरीम् ।
शिव-कान्ता, शम्भु-शक्ति, वन्दे त्वां जननी-मुमाम् ॥४॥

जगत्कर्त्री, जय-धात्री, जगत्संहार-कारणीम ।
मुनिमि: संस्तुतां, भद्रां, वन्दे त्वां मोक्ष-दायिनीम् ॥५॥

देव-दु:ख-हराम्बां, सदा देव सहायकाम् ।
मुनि देवैं: सदा सेव्यां, वंदे त्वां देव-पूजिताम् ॥६॥

त्रिनेत्रां, शंकरीं, गौरीं, भोग-मोक्ष-प्रदां-शिवाम् ।
महामायां, जगद्बीजा, वन्दे त्वां जगदीश्वरीम् ॥७॥

शरणागत, जीवानां, सर्व-दु:ख-विनाशनीम ।
सुख-संपत्कारीं, नित्यां, वन्दे त्वां प्रकृतिं पराम् ॥८॥

देव्यष्टक मिंदं पुण्यं, जोगान्देन, निर्मितम् ।
या पठेद् भक्ति भावेन, लमते स: परमं सुखेम् ॥९॥